सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अमेरिकेने जप्त केले इराणी मालवाहू जहाज ?

**वृत्तसंस्था**

**तेहरान :** ओमान सागरातील वाढत्या तणावाच्या पार्श्र्वभूमीवर इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा उघडपणे समोर आला आहे. इराण-ने अधिकृतपणे पुष्टी केली आहे की अमेरिकेने त्याच्या मालवाहू जहाज तोस्कावर हल्ला करून ते ताब्यात घेतले आहे. तेहरानने या कारवाईला समुद्री दरोडा ठरवत कठोर प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे.



इराणच्या लष्करी मुख्यालय हजरत खातम अल-अंबिया कडून जारी करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकन सैन्याने ओमान सागरातील आंतरराष्ट्रीय जल-क्षेत्रात इराणी जहाजावर हल्ला केला. निवेदनानुसार, अमेरिकन मरीन दलाने जहाजावर चढाई करून त्याची नेव्हिगेशन प्रणाली निष्क्रिय केली आणि जहाज जप्त केले.दरम्यान, अमेरिकन सैन्याच्या युनायटेड स्टेट्स सेंट्रल कमांड (सेंटकॉम) ने या कारवाईचे समर्थन केले आहे. अमेरिकेचा दावा आहे की हे मालवाहू जहाज अमेरिकेच्या नौदल नाकेबंदीचे उल्लंघन करत होते. सेंटकॉमनुसार, गाइडेड-मिसाइल डेस्ट्रॉयर यूएसएस स्प्रूअन्स (ऊऊऌ-१११) ने जहाजाला अडवले आणि अनेकदा इशारा दिला. मात्र जहाजाच्या कर्मचाऱ्यांनी आदेशांचे पालन न केल्याने अमेरिकन युद्धनौकेने गोळीबार करून त्याचे इंजिन निष्क्रिय केले. त्यानंतर अमेरिकन मरीन दलाने जहाजावर चढाई करून ते ताब्यात घेतले.अमेरिकेने ही संपूर्ण कारवाई व्यावसायिक आणि संतुलित असल्याचे म्हटले आहे. तसेच जहाजावर अमेरिकन मरीन तैनात असून, त्यामध्ये कोणता माल आहे याची तपासणी सुरू असल्याचेही सांगितले आहे. या जहाजाचे नाव तोस्का असल्याचे सांगितले जात आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर म्हटले की, हे जहाज अमेरिकन नौदलाच्या गाइडेड-मिसाइल डेस्ट्रॉयरने ओमानच्या आखातात अडवले. त्याला थांबण्याचा इशारा देण्यात आला होता, मात्र जहाजाने आदेश पाळले नाहीत. त्यानंतर नौदलाने थेट कारवाई करत इंजिन कक्षाला लक्ष्य केले आणि जहाज थांबवले.

# लिओन पो शेरिंग यांची अजिंठा लेणीला भेट

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :**जगप्रसिद्ध अजिंठा लेणीला भूतानचे गृहमंत्री लिओनपो शेरिंग यांनी भेट देत येथील अद्वितीय कला, इतिहास आणि निसर्गसौंदर्याचा मनमुराद आस्वाद घेतला. त्यांचे अजिंठा परिसरात आगमन झाले. भारतीय पुरातत्त्व विभागाच्या वतीने त्यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले.



अजिंठा लेणीतील भित्तिचित्रांची मोहकता, रंगछटांची सूक्ष्मता आणि प्राचीन कलाकारांच्या कल्पकतेचा अप्रतिम आविष्कार पाहून ते विशेष प्रभावित झाले. शेकडो वर्षांपूर्वी नैसर्गिक रंगांद्वारे साकारलेली चित्रशैली आजही तितकीच जिवंत भासते, याबाबत त्यांनी आश्र्चर्य व्यक्त केले. दगडात कोरलेली सूक्ष्म शिल्पकला, बुद्धमूर्तींची शांत मुद्रा आणि स्थापत्यकलेतील अचूकता यामुळे लेणींचा प्रत्येक कोपरा इतिहासाची साक्ष देताना दिसतो. गाईडने त्यांना अजिंठा लेणीतील चित्रशैली, शिल्पकला आणि बौद्ध धर्माशी संबंधित जातक कथांचे सविस्तर विवेचन केले. चित्रांमधून उलगडणाऱ्या जातक कथा, त्यातील भावभावना आणि जीवनमूल्यांचा संदेश याने गृहमंत्री शेरिंग भारावून गेले. हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून निसर्ग आणि कलेचा अद्वितीय संगम असल्याची भावना भूतानच्या गृहमंत्र्यांनी व्यक्त केली.

# महिलांचा हक्क डावलणाऱ्यांना धडा शिकवणार

## विरोधकांचा 'बुरखा' फाडण्यासाठी राज्यव्यापी आंदोलन करणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** संसदेत महिला आरक्षण विधेयकाच्या विरोधात मतदान करून विरोधकांनी देशातील नारीशक्तीचा अपमान केला असून, या मानसिकतेचा 'बुरखा' फाडण्यासाठी महायुतीतर्फे राज्यव्यापी आंदोलन छेडले जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे केली. १७ एप्रिल रोजी संसदेत जे घडले, तो देशाच्या इतिहासातील काळा दिवस असून महिलांच्या हक्कांची भ्रूणहत्या करणाऱ्या मारेकऱ्यांना जनता कदापि माफ करणार नाही, अशा तिखट शब्दांत मुख्यमंत्र्यांनी काँग्रेस आणि मित्रपक्षांवर हल्ला चढवला.मुंबईत आयोजित एका विशेष पत्रकार परिषदेत फडणवीस बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मंत्री पंकजा मुंडे, आदिती तटकरे, मेघना बोर्डीकर, चित्रा वाघ, खा. ज्योती वाघमारे यांच्यासह महायुतीतील महिला नेत्यांची उपस्थिती होती. २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक जनगणना आणि परिसीमनानंतर लागू होईल, हे मान्य करणाऱ्या विरोधकांनी आता सरकारकडे दोन-तृतीयांश बहुमत नसल्याचे पाहून सरड्यासारखा रंग बदलला आहे, असा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला. ते पुढे म्हणाले की, संसदेत मांडण्यात आलेली विधेयके ही २०२३ च्या घटनादुरुस्तीचाच भाग होती. २०२९ च्या निवडणुकांमध्ये जास्तीत जास्त महिला संसदेत असाव्यात, या शुद्ध हेतूनेच ही रचना केली होती, मात्र केवळ राजकीय स्वार्थापोटी विरोधकांनी महिलांच्या हक्कावर घाला घातला.या विधेयकाच्या समर्थनार्थ आता महाराष्ट्रातून एक कोटी महिलांच्या स्वाक्षऱ्या गोळा करण्यात येणार असून राज्यभर मेळावे आयोजित करून काँग्रेस, शरद पवार यांचा पक्ष आणि उबाठा गटाचा महिलाविरोधी चेहरा उघडा केला जाईल. जोपर्यंत आरक्षण मिळत नाही, तोवर स्वस्थ बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. राहुल गांधींवर टीका करताना मुख्यमंत्री म्हणाले की, खोटे बोलण्याच्या जर ऑलिम्पिक स्पर्धा झाल्या, तर त्याचे सुवर्णपदक राहुल गांधींनाच मिळेल. संविधानाने दिलेल्या संकेतानुसारच हे विधेयक असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी प्रतारणा करणाऱ्या या नेत्यांनी महिलांची साष्टांग दंडवत घालून माफी मागायला हवी.महात्मा फुलेंच्या २०० व्या जयंती वर्षातच त्यांच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम विरोधकांनी केले आहे. १९७१ ची लोकसंख्या गोठवून करण्यात आलेल्या रचनेत बदल करणे आणि प्रत्येक राज्याला समान संधी देणे हे पंतप्रधान मोदींचे उद्दिष्ट होते. या नवीन रचनेमुळे दक्षिण भारतातील राज्यांवर अन्याय होणार नव्हता, उलट त्यांचे प्रतिनिधित्व वाढणार होते, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. प्रियंका गांधींवर बोलताना त्यांनी नमूद केले की, त्या राजकारणात नव्या असल्याने कदाचित त्यांना त्यांच्या लोकांनी पूर्ण माहिती दिली नसेल, त्यामुळे मी त्यांना दोष देत नाही. मात्र, २०११ च्या जनगणनेनुसार २०२९ ला हे विधेयक लागू व्हावे ही सरकारची शुद्ध भावना होती, जिला विरोधकांनी खीळ घातली. आता जनमताचा असा अभूतपूर्व रेटा उभा केला जाईल की, विरोधकांना गुडघे टेकून महिलांच्या हक्कांना मान्यता द्यावी लागेल, असा विश्र्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३० जूनच्या आधी कर्जमाफी मिळणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :**आगामी खरीप हंगामावर 'एल निनो'चे सावट असून यंदा राज्यात दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्केच पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्र्वभूमीवर यंदा १४५.२० लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सोमवारी दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात घोषित केलेली 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना' ३० जूनच्या आत राबवली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली

.पुण्यातील शिवाजीनगर भागात नव्याने बांधण्यात आलेल्या 'सारथी'च्या सभागृहात खरीप हंगाम २०२६-२७ च्या पूर्वतयारीसाठी राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत भरणे बोलत होते. यावेळी कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यंदा खरिपासाठी २०.१७ लाख क्विंटल बियाण्यांची गरज असून, २८.०५ लाख क्विंटल साठा उपलब्ध आहे. खतांच्या बाबतीतही राज्य सुरक्षित असून, ४८.८० लाख मेट्रिक टन खतांचे आवंटन मंजूर झाले आहे. सद्यस्थितीत २५.१७ लाख मेट्रिक टन खत उपलब्ध असून, टंचाई भासणार नाही याची खबरदारी घेतल्याचे भरणे यांनी स्पष्ट केले.














## संक्षिप्त वृत्त...

### कारखाना क्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी अर्थीक बेजार

### मानवत तालूक्यातील ऊस उत्पादक बागातदार शेतकरी अर्थीक अडचणीत




**मानवत,/प्रतिनिधी-** बेजार तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्याने परिसरातील साखर कारखान्यास ऊस दिलेला आहे.
परंतु सर्वच कारखान्याने ३१ डिसेंबर पर्यंत ज्या शेतकऱ्याचा ऊस गाळापासाठी गेलेला आहे त्यांचेच पेमेंट अदा केलेले आहे.
३१ डिसेंबरच्या नंतर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्याला दमलाही दिलेलं नाही जवळपास चार महिने ऊस गाळपास देऊ नये शेतकऱ्याला त्याच्या उसाचा मोबदला मिळालेला नाही शेतकऱ्याला कधीकाळी नैसर्गिक आपत्ती याचा सामना करावा लागतो कधीकाळी कारखान्याच्या प्रशासनाशी सामना करावा लागतो चार-चार महिने झाले तरी उसाचे पैसे मिळत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल आहे काही शेतकऱ्याचे मुलीचे लग्न असो लेकराची फीस असो किंवा शेतीसाठी खते घेणे असो हे खाजगी सावकारा मार्फत करावे लागत आहे काही शेतकऱ्याकडे पूर्वीचेच खाजगी सावकाराचे कर्ज असल्यामुळे तो शेतकरी अडचणी त सापडला आहे आपण आता पूर्व मशागत कशी करायची एकीकडे मजूर मिळत नाही त्यामुळे सर्व कामे ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतकरी करत आहेत चार महिने झाले ऊस घालून छद्माही कारखान्याने दिला नाही त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक कोंडी झालेली आहे शेतकरी एकमेव असा आहे लाखो रुपयाचा ऊस कारखानदारास उधार देतो मात्र शेतकऱ्याला एक खताची गोणी ही कोणीही उदार देत नाही तरी जिल्हाधिकारी साहेबांनी याची दखल घेऊन प्रत्येक कारखान्याची केन पेमेंट यादी मागून घेऊन लवकरात लवकर शेतकऱ्याला त्याच्या उसाचे पैसे देण्यास भाग पाडावे अशी मागणी अर्थीक बेजार व अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांमधून भावना व्यक्त होत आहे.

## उन्हाचा पारा वाढला; लहान बालकांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्या-डॉ.काळे

### कॉटनचे सैल कपडे, भरपूर द्रवपदार्थ आणि दुपारच्या उन्हापासून लहान मुलांना दूर ठेवणे अत्यावश्यक

**मानवत,/प्रतिनिधी-** राज्यात तसेच मानवत शहरात सध्या उन्हाचा पारा मोठ्या प्रमाणात वाढला असून उष्णतेचा तीव्र परिणाम नागरिकांवर जाणवत आहे. विशेषतः लहान बालकांसाठी हा काळ अधिक धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे बालकांच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत मानवत येथील सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. विठ्ठल काळे यांनी व्यक्त केले आहे.....



डॉ. काळे यांनी सांगितले की, लहान मुलांची शारीरिक प्रतिकारशक्ती कमी असते तसेच त्यांची त्वचा अतिशय नाजूक असते. त्यामुळे उष्णतेमुळे त्यांना त्वचारोग, घामोळे, उष्माघात (हीट स्ट्रोक), तसेच शरीरातील पाण्याची कमतरता (डिहायड्रेशन) यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. काही वेळा ही स्थिती गंभीर होऊ शकते, त्यामुळे पालकांनी विशेष सतर्कता बाळगणे गरजेचे आहे.उन्हाळ्यात बालकांना सैल, हलक्या रंगाचे आणि कॉटनचे कपडे परिधान करणे अत्यंत आवश्यक आहे. सिंथेटिक किंवा घट्ट कपडे टाळावेत. कॉटन कपड्यांमुळे शरीराला हवा खेळती राहते आणि घाम शोषला जातो, त्यामुळे त्वचेचे विकार टाळता येतात....सकाळी १२ ते दुपारी ०४ या वेळेत उन्हाची तीव्रता सर्वाधिक असते. या काळात बालकांना घराबाहेर नेणे टाळावे. अत्यावश्यक असल्यास डोक्यावर टोपी, छत्री किंवा कापड वापरून संरक्षण करावे....बालकांच्या शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी वेळोवेळी पाणी, दूध, लस्सी, ताक यांसारखे द्रवपदार्थ द्यावेत. नवजात बालकांसाठी आईचे दूध हेच सर्वोत्तम असल्याचे त्यांनी नमूद केले....घर थंड व हवेशीर ठेवणे गरजेचे आहे. थेट सूर्यप्रकाश बालकांवर पडणार नाही याची काळजी घ्यावी. पंखा, कूलर किंवा आवश्यक असल्यास एसीचा योग्य वापर करावा; मात्र थंड वातावरण अचानक बदलू देऊ नये.....बालकांमध्ये सतत रडणे, अंग गरम होणे, अशक्तपणा, उलट्या, जुलाब किंवा भूक न लागणे अशी लक्षणे दिसल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही डॉ. काळे यांनी सांगितले.....उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर लहान मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे ोकादायक ठरू शकते. साध्या गोष्टींची काळजी घेतल्यास अनेक आजार टाळता येऊ शकतात. त्यामुळे सर्व पालकांनी जागरूक राहून बालकांचे संरक्षण करावे, असे आवाहन डॉ. विठ्ठल काळे यांनी केले आहे.

## मानवत येथे श्री योगानंद महाराज चरित्राचे सामूहिक पारायण सोहळा संपन्न

**मानवत,/प्रतिनिधी-** येथील श्री योगानंद महाराज स्थापित श्री दत्त मंदिर मध्ये श्रीमत् प.प.स. योगानंद सरस्वती स्वामी महाराज समाधी शताब्दी वर्षानिमित्त सामूहिक पारायण सोहळा शनिवारी दिनांक १८ एप्रिल रोजी जुने दत्त मंदिर सभागृहात श्री योगानंद महाराज संस्थान गुंज विश्वस्त श्री भक्तेशभाई देसाई महाराज यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.
श्रीमत् प.प.स. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांचे पट्टे शिष्य श्रीमत् प.प.स.योगानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या समाधी शताब्दी सोहळा सन २०२८ मध्ये भव्य दिव्य स्वरूपात साजरा करण्याचा मानस श्री योगानंद महाराज संस्थान गुंज चे पिठाधीश श्री परमपूज्य राजेशभाई देसाई महाराज यांचा आहे.
म्हणून परभणी जिल्ह्यात व मराठवाड्यात ज्यांनी दत्तभक्तीची गोडी निर्माण केली असे श्री योगानंद महाराज यांच्या जीवन कार्य व लीला जनसामान्य भक्तांना माहीत व्हावी व दत्त भक्तीची गोडी समस्त भक्त गणामध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने ज्या ठिकाणी श्री योगानंद महाराजांचे वास्तव्य होते अशा ठिकाणी श्री योगानंद महाराज चरित्र या दिव्य ग्रंथाचे सामूहिक पारायण प्रत्येक महिन्यात

# सखी वन स्टॉप सेंटर' : संकटातील महिलांसाठी आधार, न्याय आणि नवजीवनाचा मार्ग

### १,०७३ पीडित महिलांना मिळाला न्यायाचा दिलासा

**परभणी,/प्रतिनिधी-** सखी वन स्टॉप सेंटर' : संकटातील महिलांसाठी आधार, न्याय आणि नवजीवनाचा मार्ग १,०७३ पीडित महिलांना मिळाला न्यायाचा दिलासा मिळाला आहे.

परभणीतील महिलांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहत, त्यांना तात्काळ कायदेशीर व मानसिक आधार देणारे परभणीतील 'सखी वन स्टॉप सेंटर' महिलांसाठी खऱ्या अर्थाने जीवनदायी ठरत आहे.

केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाच्या माध्यमातून २८ डिसेंबर २०१८ पासून सुरू झालेल्या या केंद्राने आतापर्यंत तब्बल १,०७३ पीडित महिलांना न्याय मिळवून देत आशेचा किरण निर्माण केला आहे.

या केंद्रामार्फत पीडित महिलांना पोलीस मदत, कायदेशीर सल्ला, मानसिक समुपदेशन अशा सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जातात. विशेष वकिलांमार्फत कायदेशीर प्रक्रियेचे मार्गदर्शन केले जाते, तर मानसिकदृष्ट्या खचलेल्या महिलांना पुन्हा उभारी देण्यासाठी समुपदेशनाचा आधार दिला जातो. गरजू महिलांसाठी पाच दिवसांपर्यंत सुरक्षित निवासाची सोय देखील येथे उपलब्ध आहे.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीमती एम. एस. रंधवे यांच्या मार्गदर्शनाखाली हे केंद्र प्रभावीपणे कार्यरत असून, महिलांसाठी एक मजबूत आधारस्तंभ ठरत आहे. परभणीतील नानलपेठ येथील पशुसंवर्धन कार्यालय, पोलीस मुख्यालयासमोर हे केंद्र कार्यरत आहे.

एकाच छताखाली सर्व सुविधा - शारीरिक, मानसिक, लैंगिक छळ, कौटुंबिक हिंसाचार, ॲसिड हल्ला व सायबर क्राईमच्या बळी ठरलेल्या महिलांना पोलिस, वकील आणि रुग्णालयात धाव घ्यावी लागते. ही पायपीट थांबवण्यासाठी सखी वन स्टॉप सेंटर केंद्र एकाच छताखाली सहा प्रकारच्या सेवा २४ तास विनामूल्य पुरवते.

मदतीसाठी संपर्क साधा - केंद्र प्रशासक तेजस्विनी कांबळे यांनी महिलांना आवाहन केले आहे की, कोणत्याही प्रकारच्या छळाला बळी पडल्यास न घाबरता पुढे यावे. पीडित महिलांना तातडीच्या मदतीसाठी शासनाचा १८१ हा हेल्पलाइन क्रमांक किंवा केंद्राच्या फोन ०२४५२-२२५५०५ मोबाईल




७८७५७८७५४० या क्रमांकावर संपर्क साधता येईल. 'सखी वन स्टॉप सेंटर' हे केवळ सेवा केंद्र नसून, संकटात सापडलेल्या महिलांसाठी न्याय, संरक्षण आणि नव्या आयुष्याची नवी दिशा देणारे ठिकाण ठरत आहे.




**जिंतूर-अंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे विभागीय अध्यक्ष सुनील डोंबे यांच्या राम मंदिर कसबा गल्ली येथील निवासस्थानी आंतरारराष्ट्रीय हिंदू परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रविण भाई तोगडिया यांनी धावती भेट दिली यावेळेस स्थानिक नागरिक उपस्थित होते.**

## काम संथगतीने होत असल्यामुळे अपघातात वाढ आज पून्हा रस्त्यातील खड्यामुळे फोर व्हिलरचा अपघात

**मानवत,/प्रतिनिधी-** रस्ता विकास कामे संथ गतिने होत असल्याने संशोधनाचा विषय बनला आहे. मार्च एण्ड मुळे थांबला असेल पण आता पर एप्रिल सूरू आहे. उन्हाचा पारा चढत असून तरी ही कामाकडे वरिष्ठांचे दूर्लक्ष का ? असा सवाल नागरिकांना पडला आहे.मानवत ते पाळोदी रोड मानवत बसस्थानका पासून ते रोडे कॉलणी पर्यंतची कामे अर्धवट राहिल्यामुळे आजपर्यंत बरेच अपघात या रोड वर झाले आहेत. जवळ पास सहा महिन्या पासून काम संथ गतीने चालू आहे असे ग्रामिण भागातून येणारे नागरिक दबक्या आवाजात बोलत आहेत. तरी शासन या कामाकडे का ? लक्ष देत नाही. असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.
या खोदकाम केलेल्या रस्त्यावर ग्रामिण भागातून येणाऱ्या बऱ्याच मोटरसायकल



स्लीप होऊन महिला देखील गाडीवरून खाली पडल्या आहेत. तर या घटने मध्ये कोणाचा हात फॅक्चर तर कोणाचा पाय फ्रॅक्चर झालेले आहे. तर अनेक गाड्या स्लीप होऊन खाली पडले आहेत. आज ही अशीच घटना एक फोर व्हिलर आपली गाडी घेऊन खड्ड्यात जाऊन पडली नशिब बलवत्तर असल्यामुळे जीव वाचला नागरिकांनी धावाधाव करून गाडी गड्यामधून चालकासह बाहेर काढली म्हणून चालकाचा जीव वाचला. या कामाकडे नामांकित गुत्तेदार लक्ष देतील का ? एक दोन जीव गेल्यानंतर काम पूर्ण होईल अशी नागरिकांची प्रतिक्रिया पाहायास मिळत आहे. बसस्थानक ते रोडे कॉलणी ठेवली आहे काम अर्धवट सोडून हे काम पूर्ण कधी होईल अशी प्रतिक्रिया जनतेतून होत आहे मानवतला येण्यासाठी ग्रामीण भागातून महत्त्वाचा एकच रस्ता आहे या रस्त्याने अनेक ग्रामीण भागातून लोक ये जा करतात सर्व खेडी तालुक्याला जोडलेले याच रोडने आहेत.

## गंगाखेड नगर परिषदेत अधिकाऱ्यांची जनगणना पूर्वतयारीची पाहणी

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** नगर परिषद कार्यालयामध्ये जनगणना पूर्वतयारी संदर्भात माहितीची सखोल पडताळणी करण्यात आली.यासाठी सहायक संचालक व जिल्हा समन्वयक बी.प्रसाद तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जनगणना कक्षाचे समन्वयक संदीप कुलकर्णी,अल्ताफ यांनी (दि.१ एप्रिल बुधवार) रोजी गंगाखेड नगर परिषद कार्यालयाला भेट दिली.यावेळी त्यांनी जनगणना प्रक्रियेतील विविध बाबींचा आढावा घेतला आणि प्रत्यक्ष कामकाजाची माहिती तपासून पाहिली संबंधित नोंदी,कागदपत्रे व माहिती प्रणालीची अचूकता याची खात्री करण्यात आली.या पाहणीदरम्यान कार्यालयीन अधीक्षक नागनाथ साळवे,अकाउंट विभागाचे सुरेश मणियार तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गंगाखेड नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देत आगामी जनगणना प्रक्रिया सुरळीत व अचूक पार पाडण्याचे मार्गदर्शन केले.जगातील ही




सर्वात मोठी जनगणना दोन टप्प्यांत होणार असून पहिल्या टप्प्याला दिनांक १ एप्रिल बुधवार २०२६ पासून सुरूवात झाली आहे. ही जनगणना पहिल्यांदाच पूर्णपणे डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे.तसेच नागरिकांना स्वतःहून माहिती भरण्याचा पर्यायही प्रथमच उपलब्ध करून दिला जाणार आहे.दुसरा टप्पा १६ मे ते १४ जून दरम्यान होणार आहे. जनगणना पूर्वतयारीचे हे काम वेळेत आणि काटेकोरपणे पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे,असेही यावेळी सूचित करण्यात आले.

## सातबारा हॉटेलसमोर खुलेआम दारू विक्री; सेलू पोलिसांची धडक कारवाई, आरोपी जेरबंद

**सेलू । प्रतिनिधी :** पाथरी-सेलू रोडवरील मानोली पाटी परिसरात सार्वजनिक रस्त्यावर बेकायदेशीररीत्या देशी व विदेशी दारू विक्री करणाऱ्या इसमावर सेलू पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत एकूण ५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, दि. १७ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ४:३० वाजण्याच्या सुमारास सातबारा हॉटेल समोर सार्वजनिक रोडवर सखाराम भागवत उगले (वय ४८, रा. शिमुरगव्हाण, ता. पाथरी) हा विनापरवाना दारू विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकत आरोपीस रंगेहात पकडले.या वेळी आरोपीकडून ४ हजार रुपये किमतीच्या 'रॉयल स्टॅग' कंपनीच्या १६ बाटल्या तसेच १ हजार ६०० रुपये किमतीच्या 'भिंगरी संत्रा' देशी दारूच्या २० बाटल्या, असा एकूण ५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
या प्रकरणी उपविभागीय कार्यालयाचे वाचक पोउपनि दिगांबर शिवाजी दहीफळे यांच्या फिर्यादीवरून सेलू पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २०६/२६, कलम ६५ (इ) महाराष्ट्र प्रोहिबिशन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महावितरणच्या हलगर्जीपणाचा फटका; सावळीतील शेतकऱ्यांचे दोन लाखांचे नुकसान

**मानवत ,/प्रतिनिधी:** महावितरणच्यानिष्काळजी व हलगर्जी कारभारामुळे मानवत तालुक्यातील सावळी येथे शेतकऱ्याचे जवळपास दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्याची गंभीर घटना घडली आहे. वीजवाहिनीतील फॉल्टमुळे लागलेल्या आगीत उभे पीक, कडबा, संत्र्याची झाडे आणि ठिबक सिंचन संच जळून खाक झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सावळी ता. मानवत येथील शेतकरी दत्ता वैजनाथ काळे शेतात ही घटना घडली. वीज लाईनमध्ये अचानक फॉल्ट होऊन ठिणग्या पडल्याने शेतात आग लागली. या आगीत दोन एकर क्षेत्रातील ज्वारी कडबा, उभी ज्वारी, संत्र्याची झाडे तसेच संपूर्ण ठिबक सिंचन संच जळून खाक झाला. नुकसानाचा प्राथमिक अंदाज पुढीलप्रमाणे व्यक्त करण्यात आला आहे :
ज्वारी कडबा अंदाजे ३० गंजी ₹१,५०० = ₹४५,०००
ज्वारी उत्पादन १२ क्विंटल ₹४,५०० = ₹५४,०००
संत्र्याची झाडे ५०० ₹१०० = ₹५०,०००



एकूण अंदाजे ₹१,९३,००० ही रक्कम इतके नुकसान झाले असून वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ग्रामीण भागात जीर्ण वीजवाहिन्या, सैल तारांचा

न केल्याने अशा घटना वारंवार घडत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. ''बिल वसुलीत तत्परता आणि सुरक्षेत शून्यता'' अशी तीव्र प्रतिक्रिया ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे.

नुकसानभरपाईची मागणी सदर घटनेचा तातडीने पंचनामा करून महावितरणने जबाबदारी स्वीकारावी व शेतकरी दत्ता काळे यांना तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# आत्मनिर्भरतेला पर्याय नाही...

‘सैन्य हे केवळ भावनेच्या बळावर नव्हे, तर भरल्या पोटातून मिळणाऱ्या बळावर चालत असते, पोट भरलेले असेल तर अधिक जोमाने आणि त्वेषाने लढत असते, हे वारंवार सिद्ध झाले आहे’- नेपोलियन बोनापार्टचे हे विधान पुढे प्रसिद्ध म्हण म्हणून रूढ झाले आहे. लष्कराच्या दिमतीला पुरेसे वित्तीय बळ नसले तर सैनिक कितीही लढवय्ये असले तरी त्यांचे पानिपत झाल्याशिवाय राहत नाही. जग गेल्या तीन वर्षांपासून युद्धांच्या अनुभवातून जात आहे. २०२३ मध्ये सुरू झालेले रशिया-युक्रेन युद्ध अजूनही थांबलेले नाही. सध्या दोन्ही देशांनी फक्त काही काळासाठी युद्धविराम घोषित केला आहे. २०२५ मध्ये सहा महिन्यांचे इस्रायल-इराण युद्ध भडकले होते. ती आग शांत होते न होते तोच, नव्याने संपूर्ण पश्चिम आशिया भयंकर संघर्षांच्या आगीत होरपळतो आहे. हा संघर्ष इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातच मर्यादित राहिला नसून त्याची झळ जगाला बसत आहे. अनेक देशांच्या अर्थव्यवस्था खिळखिळ्या झाल्या आहेत. मध्यपूर्वेतील इराण, ओमान, संयुक्त अरब अमिरात, कतार, सौदी अरेबिया, इराक, सीरिया, लेबनॉन आणि बहरीन या देशांची अपरिमित वित्तहानी झाली आहे. इराणने तर अमेरिकेसोबत लढण्याच्या हट्टापायी स्वतःवर भयंकर संकट ओढवून घेतले. हजारो निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. पायाभूत सुविधांची झालेली नासधूस तर प्रचंड आहे. अमेरिकेलाही आपली अब्रू वाचविण्यासाठी मध्यपूर्वेतील लष्करासाठी उभारलेल्या पायाभूत सुविधा गमवाव्या लागल्या आहेत. संघर्ष अजूनही थांबलेला नाही. केवळ दोन आठवड्यांसाठी थांबविण्यात आला आहे; पण संकट टळलेले नाही. अमेरिकेकडे डोनाल्ड ट्रम्प तर इराणकडे मोजतबा यांच्यासारखे हट्टी आणि विनाश ओढवून घेणारे नेतृत्व आहे. अजूनही यापैकी कुणीही मागे हटायला तयार नाही. होर्मुझच्या सागरी मार्गावर लढाऊ जहाजे नांगरून व्यापारी मार्ग बंद करून टाकला. वास्तविक पाहता संयुक्त राष्ट्र संघाच्या ‘कन्व्हेन्शन ऑन द ला ऑन द सी’नुसार कोणताही देश आंतरराष्ट्रीय सागरी मार्ग एकतर्फी रोखू शकत नाही. देशांमध्ये शांततापूर्ण सहअस्तित्व आणि सहकार्याला प्रोत्साहन देणारी मानके या कायद्याद्वारे प्रस्थापित करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे युनोच्या या कायद्याने हाही अधिकार दिला आहे की, एखाद्या सागरी प्रदेशातून जाण्यासाठी संबंधित देशाच्या कायद्यानुसार परवानगी आवश्यक असली तरी किंवा संबंधित देशाचे नियंत्रण असले तरी युनोच्या सागरी कायद्यानुसार प्रादेशिक जलक्षेत्रातून मुक्त आणि शांततापूर्ण प्रवासाचा हक्क सर्वच देशांना मिळाला आहे. तसेच एखादे जहाज किंवा नौका शांतता आणि सुव्यवस्थेत जोपर्यंत अडथळा आणत नाही, तोपर्यंत परवानगी न घेताही एखाद्या देशाच्या सागरी हद्दीतून बिनदिक्कत प्रवास करू शकते. विशेष म्हणजे पाणबुड्यांनाही हा अधिकार मिळतो. वाहतुकीस योग्य असलेले सागरी क्षेत्र एखाद्या देशाच्या किनाऱ्यालगत असले तरी ते पूर्णपणे सागरी प्रवासासाठी बंद केले जाऊ शकत नाही. युनोच्या या कायद्यातील कलम १७ नुसार हे स्पष्ट केले की या कायद्याच्या अधीन राहून सर्व देशांच्या जहाजांना, मग ती किनारी असोत की भूवेष्टित, प्रादेशिक समुद्रातून निर्दोष प्रवास करण्याचा हक्क प्राप्त होतो. पण, होर्मुझच्या खाडीत सध्या जे दोन देश दादागिरी करीत आहेत, त्या इराण अथवा अमेरिका यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या ‘कन्व्हेन्शन ऑन द ला ऑन द सी’ या कराराला मान्यता दिलेली नाही. तसाही युनोला किमान युद्धाच्या बाबतीत फार अर्थ राहिला नाही. अमेरिकेचे धोरण तर ‘बळी तो कानपिळी’, असे सातत्याने राहिलेले आहे. इराणवर तर कुणाचेच नियंत्रण राहिलेले नाही. होर्मुझचा सागरी महामार्ग दोन्ही देशांनी बेकायदेशीरपणे रोखून धरल्याने आशियातील बहुतांश देशांना आर्थिक फटका बसतो आहे. विशाल लोकसंख्या असलेला भारतही यातून सुटलेला नाही. पण, अशाही संकटाच्या स्थितीत भारत जवळपास वर्षभरापासून तग धरून आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये भारतावर ५० टक्के व्यापार शुल्क लादले. भारताला मित्र म्हणून संबोधणाऱ्या ट्रम्प यांनी घेतलेल्या या निर्णयाचे नकारात्मक परिणाम नाही म्हटले तरी निर्यातीवर झाले. रशियाकडून कच्चे तेल आयात करणाऱ्या देशांवर कधी शंभर टक्के तर कधी ५०० टक्के व्यापार शुल्क लादण्याची धमकी ट्रम्प सातत्याने देत होते. नाही म्हटले तरी भारताला काही महिने तरी रशियाकडून तेलाची आयात कमी करावी लागली. ती पूर्णपणे थांबविलेली नव्हती. रशिया युद्धजन्य परिस्थितीचा सामना करीत असतानाही हा देश सातत्याने भारताच्या पाठीशी उभा राहिलेला आहे. एक आशादायी बाब म्हणजे भारत-अमेरिका व्यापारासंदर्भात भारताच्या केंद्रीय व्यापार मंत्रालयाने आयात-निर्याती संदर्भात जी आकडेवारी जारी केली आहे, तीत डोनाल्ड ट्रम्प काहीही बरळत असले तरी दोन्ही देशांतील व्यापार सुरळीत सुरू असल्याचे दिसून आले. २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताची सर्वाधिक निर्यात अमेरिकेत झाली आहे. या काळात भारताने अमेरिकेत ८७.३०८ अब्ज डॉलर्स किमतीची विविध उत्पादने निर्यात केली. याचा परिणाम म्हणजे दोन्ही देशांमधील व्यापारातील तूट मोठ्या प्रमाणात कमी होण्यात मदत झाली. ऑक्टोबर २०२५ मध्ये दोन्ही देशांतील व्यापारी तूट ४९.६८ अब्ज डॉलर्स एवढी होती, तर मार्च २०२६ मध्ये ती अर्ध्यापेक्षा खाली म्हणजे २०.६७ अब्ज डॉलर्सवर आली. अर्थात आज दोन्ही देशांना एकमेकांची गरज आहे, हे सिद्ध झाले. भू-राजकीय पातळीवर मात्र, अमेरिका भारतासाठी बेभरवशाचा सहकारी असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले. आणि या मुद्यावर रशिया हा खात्रीलायक मित्र म्हणून सिद्ध झाले. काहीही झाले तरी भारताला कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरूच ठेवण्याची भूमिका पुतिन यांनी घेतली. १९७१ चे युद्ध असो की कारगिलचा संघर्ष, या कथित साम्यवादी देशाने भारताला सतत मदतीचा हात दिला. दोन्ही देशांतील मैत्रीचा सेतू हा परस्पर सहकार्य आणि विश्वासावर उभा आहे. अनेक स्थित्यंतरे घडली, अनेक सरकारे आली-गेली; पण, मैत्री मात्र कायम राहिली.

रशियाचे अध्यक्ष ब्लादिमिर पुतिन हे येत्या सप्टेंबरमध्ये भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. विशेष म्हणजे वर्षभरातील पुतिन यांचा हा दुसरा भारत दौरा असेल. रशिया-भारत वार्षिक परिषदेच्या निमित्ताने डिसेंबर २०२५ मध्ये युक्रेनशी युद्ध सुरू असतानाही पुतिन भारतात आले होते. आता सप्टेंबरमध्ये ब्रिक्स परिषदेचे यजनमानपद भारताकडे आहे. या परिषदेसाठी पुतिन यांचा दौरा निश्चित असल्याचे रशियन परराष्ट्र खात्याने स्पष्ट केले आहे. रशिया मित्र आहे हे खरे; मात्र भारताने आणखी कितीकाळ रशियाच्या मदतीवर विसंबून राहावे हा प्रश्न कधी तरी विचारात घ्यावा लागेलच. रशियाचे सहकार्य लाभले नसते तर भारताची आर्थिक स्थिती आणखीनच बिकट झाली असती हेही खरे. भारतानेही यासाठी रूबल्स म्हणा की डॉलर्स, त्यात रक्कम मोजली आहे. विशेष म्हणजे संघर्षाच्या संपूर्ण काळात भारताने भू-राजकीय स्थिती अत्यंत संयमाने आणि कुशलतेने हाताळली. आशियातील अनेक देशांमध्ये वायू आणि इंधन संकट निर्माण आहे. तेलसमृद्ध इराणच्या सीमेला लागून असलेल्या पाकिस्तानात सुद्धा लॉकडाऊन करण्याची पाळी आली. जेमतेम २० कोटी लोकसंख्या असलेला देश सांभाळताना शाहबाज शरिफांच्या तोंडाला फेस आलेला असताना पंतप्रधान मोदींनी मात्र देशातील आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवले आहे. पावणे दोन महिन्यांपासून मध्यपूर्वेतील संघर्ष सुरू असतानाही पेट्रोल, डिझेलच्या किमती स्थिर आहेत. केवळ स्वयंपाकाच्या गॅसच्या किमतीत किंचित वाढ केली गेली. युक्रेन-रशिया युद्ध भरात असताना भारताने रशियाकडून सवलतीच्या दरात प्रचंड प्रमाणात कच्चे तेल आयात केल्यानंतर ते जागतिक बाजारात विकून तयार केलेली बेगमी आता संकटाच्या काळात कामी येत आहे. पण, दीर्घकाळाचा विचार करून भारताला आज ना उद्या ऊर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भर व्हावेच लागणार आहे, हा संदेश सध्याच्या जागतिक संघर्षाच्या काळातून मिळाला आहे. त्यामुळे पुतिन यांचे स्वागत करताना असो की अमेरिकेला दाखवणे असो; आत्मनिर्भरतेला पर्याय नाही हेच आपल्याला लक्षात ठेवावे लागेल.

## दिल्ली दिनांक

# एक साप, एक राष्ट्रपती!

**रवींद्र दाणी**

“एक दयाळू- कनवाळू महिला होती. एकदा तिला अर्धवट गोठलेला साप आढळला. तिला त्याची दया आली. महिलेने सापावर काही उपचार केले. थोड्या वेळात साप शुद्धीवर आला आणि त्याने पहिला चावा घेतला, त्याला वाचविणाऱ्या त्या महिलेलाच.” राष्ट्रपती ट्रम्प आपल्या पहिल्या कारकीर्दीत आपल्या भाषणांमध्ये ही गोष्ट रंगवून सांगत असत. त्यांचा रोख क्युबातून अमेरिकेत येणाऱ्या निर्वासितांवर होता. पण, काही मानसतज्ज्ञांच्या मते ही बाब ट्रम्प यांनाच लागू पडते.

३ ऑक्टोबर २०१७ मध्ये अमेरिकेत एका पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले होते. त्यावर्षीचे ते सर्वाधिक खपाचे पुस्तक ठरले. त्यात सापाची ही कथा सांगण्यात आली आहे. पुस्तकाचे शीर्षक आहे- ‘द डेंजरस केस ऑफ डोनाल्ड ट्रम्प.’

**२७ तज्ज्ञांचे पुस्तक** : अमेरिकेतील २७ प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञांनी हे पुस्तक लिहिले असून, त्याचे संपादन येल विद्यापीठातील श्रीमती बॅण्डी ली यांनी केले आहे. एका हाती हे पुस्तक घ्यावे आणि दुसऱ्या हाताने टीव्हीचा रिमोट हाती घेत ट्रम्प यांची विधाने ऐकावीत. पुस्तकातील प्रत्येक शब्दाचे प्रतिबिंब ट्रम्प यांच्या वागणुकीत दिसून येते. पुस्तकात श्रीमती ली यांनी एक प्रांजळ कबुली दिली आहे. हे पुस्तक तयार करताना आम्ही ‘गोल्डन वॉटर रुल’चे पालन केलेले नाही. याचा अर्थ ज्या व्यक्तीबाबत हे पुस्तक लिहिण्यात आलेले आहे, त्याची मानसशास्त्रीय तपासणी न करता आम्ही हे पुस्तक लिहिले आहे. पुस्तक लिहिणारे सारे लेखक मानसशास्त्रात एम. डी. आणि पीएच. डी. केलेले आहेत.

**सहलेखक** : राष्ट्रपती ट्रम्प, आपण कोणतेही ‘डिल’ म्हणजे तडजोड वा सौदा करण्यात कसे निष्णात आहोत हे सांगत असतात. याबाबत त्यांनी ‘द आर्ट ऑफ द डिल’ हे पुस्तकही लिहिले. या पुस्तकाचे त्यांचे सहलेखक टोनी सचवार्टस ट्रम्प यांच्याबाबत लिहितात, “स्वतःला सुरुंग लावण्याचा त्यांचा गुण त्यांच्या भूतकाळात लपला आहे. आपल्या चुका- निर्णय याबाबत आत्मपरीक्षण करण्याऐवजी ते त्यावर तडकतात.” टोनी पुढे लिहितात, कुणावरही विश्वास न ठेवणे ही त्यांची खरी समस्या आहे. आणि यामुळेच त्यांचे व आमचे म्हणजे अमेरिकेचेही पतन होईल.

**‘नॉर्मल’ नाहीत** : राष्ट्रपती ट्रम्प यांचे व्यक्तित्व सामान्य म्हणजे नॉर्मल नाही आणि देशाला हे सांगण्याचे कर्तव्य आपण बजावले पाहिजे असे मत जेम्स गॅलिगन यांनी या पुस्तकात नोंदविले आहे. कॅलिगन यांनी शालीन शब्दात ट्रम्प हे कसे विचित्र आहेत हेच सांगितले आहे.



**२५ वी घटनादुरुस्ती** : अमेरिकन घटनेच्या २५ व्या दुरुस्तीनुसार काँग्रेसला राष्ट्रपतींना हटविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. काँग्रेसने एक निष्पक्ष व स्वतंत्र डॉक्टरांचे पॅनेल गठित करून ट्रम्प यांच्या मानसिक अवस्थेचे परीक्षण करून ते राष्ट्रपतिपदावर राहण्यास सक्षम आहेत काय याची तपासणी करावी असे मत नॉन्थे काटरेल व डी मॉसबाचेर या दोघांनी पुस्तकात नोंदिविले आहे. या दोघांनी तर एक मौलिक सूचना केली आहे, प्रत्येक राष्ट्रपती-उपराष्ट्रपती निवडणुकीपूर्वी निवडणुकीतील उमेदवाराच्या मानसिक स्थितीचे मूल्यांकन करण्यात यावे आणि निवडणूक झाल्यावर विजयी होणाऱ्या उमेदवाराचे म्हणजे राष्ट्रपतीची दरवर्षी मानसिक तपासणी करण्यात यावी.

**‘मोस्ट डेअरिंग बुक’** : २०१७ मध्ये हे पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प यांच्यासोबत काम करणाऱ्या काही अधिकाऱ्यांनी लपून छपून हे पुस्तक खरेदी करून ते वाचले होते अशी माहिती नंतर समोर आली तर वॉशिंग्टन पोस्ट या दैनिकाने या पुस्तकाचे वर्णन, द मोस्ट डेअरिंग बुक या शब्दात केले होते.

**शालीनता गमावली** : राष्ट्रपती ट्रम्प आपल्या दुसऱ्या कारकीर्दीत ज्याप्रकारे वागत आणि बोलत आहेत ते या पुस्तकातील प्रत्येक पृष्ठावर त्यांच्याबाबत नोंदविण्यात आलेले अभिप्राय किती नेमके व अचूक आहेत याची खात्री देणारे आहेत. ट्रम्प दुसऱ्यांदा राष्ट्रपती झाल्यानंतर माजी राष्ट्रपतींची तैलचित्रे व्हाईट हाउसमध्ये लावण्यात आलीत. तेव्हा त्यांनी आपले पूर्ववर्ती राष्ट्रपती जोसेफ बायडेन यांचे तैलचित्र न लावण्याचा आदेश दिला. माजी राष्ट्रपती बराक ओबामा यांच्याबाबत आक्षेपार्ह व्हिडीओ तयार करून ते त्यांनी आपल्या समाज माध्यमावर टाकले.

**ताज्या घटना** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी एका वाहिनीला मुलाखत दिली. मुलाखत घेणाऱ्या महिला पत्रकारास ते म्हणतात, फार वर्षांपूर्वी आपली भेट झाली होती. तेव्हा तू संदर दिसत होतीस आणि आजही तेवढीच सुंदर दिसतेस. अमेरिकन चौकशी संस्था एफबीआयचे माजी प्रमुख रॉबर्ट मुल्लर यांचे नुकतेच निधन झाले. मुल्लर हे अतिशय प्रतिष्ठित व नावाजलेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनावर ट्रम्प म्हणाले, ‘गुड! आय ॲम ग्लॅड. ही इज डेड’.

**लिटल रॉकेट मॅन** : उत्तर कोरियाचे राष्ट्रपती किम जोंग यांचा उल्लेख लिटल रॉकेट मॅन असा करताना ट्रम्प म्हणतात, जोंग मला म्हातारा म्हणतात. पण, मी तर त्यांना जाड्या व बुटका म्हटलेले नाही.

**युद्धाचा विषय** : साऱ्या जगाला युद्धाच्या वणव्यात लोटल्यानंतर ट्रम्प म्हणतात, आम्ही इराणमध्ये कुणाशी चर्चा करावयाची? चर्चा करण्यासाठी कुणी शिल्लकच उरलेले नाही आणि २४ तासानंतर ते म्हणतात, आमची इराणशी चर्चा सुरू आहे. चर्चा फार चांगल्या प्रकारे सुरू आहे.

**पत्रकार ते पंतप्रधान** : पत्रकार असो की देश-विदेशांचे राष्ट्राध्यक्ष वा पंतप्रधान, कुणाबद्दलही ट्रम्प आदराने बोलावयास तयार नाहीत. प्रत्येकाशी ते धमकीच्या भाषेत बोलत आहेत. युक्रेनचे राष्ट्रपती झेलेन्स्की व्हाईट हाऊसमध्ये आले असताना, आपल्या ओव्हल कक्षात ट्रम्प ज्याप्रकारे वागले, त्याची चर्चा साऱ्या जगभर झाली. पण, आता ही एक सामान्य बाब झाली आहे . प्रत्येक राष्ट्राध्यक्ष वा पंतप्रधान यांच्याशी ते अशाच प्रकारे वागू लागले आहेत. त्यांच्या तावडीतून अमेरिकेची मित्र मानली जाणारी नाटो संघटनाही सुटलेली नाही.

**उपराष्ट्रपती अलिप्त** : अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यापासून उपराष्ट्रपती जेडी व्हान्स यांनी एकप्रकारे स्वतःला अलिप्त ठेवले आहे. कारण, त्यांना इराणवर हल्ला करण्याचा हा निर्णय मान्य नव्हता. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी हा निर्णय ट्रम्प यांच्या गळी उतरविला असे त्यांना वाटते. यानंतर व्हान्स व नेतान्याहू यांच्यात दूरध्वनीवर फार गरमागरमी झाली असे आता समोर आले आहे. व्हान्स यांची नजर २०२८ च्या राष्ट्रपती निवडणुकीवर स्थिरावली आहे. त्यातूनच त्यांनी इराण प्रकरणापासून स्वतःला दूर ठेवले आहे. परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो हेही युद्धाच्या निर्णयावर फार खुश दिसत नाहीत. फक्त युद्धमंत्री पीट हेगसेथ हे मात्र युद्धाच्या बाजूने असल्याचे दिसते.

**‘ती’वेळ येणार...** : राष्ट्रपती ट्रम्प यांच्या चार वर्षांच्या कार्यकाळापैकी फक्त १४ महिने सरले आहेत. उर्वरित ३४ महिन्यांत ते कुणाकुणाशी युद्ध करणार हा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. त्यांना क्युबा हवा आहे, त्यांना ग्रीनलॅण्ड देश हवा आहे, त्यांना पनामा कालवा हवा आहे. ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिकेतील जनमानस क्षुब्ध झाले असल्याचे दिसते. ट्रम्प असेच वागत राहिल्यास, मानसिक आजाराच्या कारणाखाली त्यांना पदावरून हटविले जाईल काय? अमेरिकेच्या काही राष्ट्रपतींना वेगवेगळ्या घोटाळ्यात राजीनामा द्यावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत. पण, मानसिक आजारासाठी आजवर कुणालाही राजीनामा द्यावा लागलेला नाही. ट्रम्प हे तसे पहिले राष्ट्रपती ठरतील काय? स्वतःलाच सुरुंग लावण्याचा त्यांचा ‘गुण’ हे घडवील काय? या प्रश्नांची उत्तरे ट्रम्पच देणार आहेत.

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# उन्हाळ्यात पाणी पेटते पावसाळ्यात मात्र विझते!

जन्मापासून मृत्यूपर्यंत सोबत करतं पाणी, जीवनाच्या काठावर शेवटचं आचमन असतं पाणी. एवढा मौल्यवान प्रश्न असूनही तो नेहमीच उन्हाळ्यात पेटतो, पण पावसाळा येताच विझतो. या पद्धतीने पाणी प्रश्न कधीच सुटणार नाही. उलट त्यात गुंता वाढेल अन् भविष्यात शेकडो लोकांना तडफडून कदाचित मारेलही. सरकारने जलस्तर वाढावा म्हणून प्रत्येक नवीन इमारतीवर पाण्याचे पुनर्भरण करण्याची सक्ती केली आहे. ती सक्ती सर्वच इमारतींसह घरांवर करायला हवी. पाण्याचा जमिनीतून वाढत असलेला उपसा गंभीर विषय आहे. बँकेतील खात्यात जेवढी रक्कम असते त्यातील काही पैसे तसेच ठेवून उर्वरित काढावे लागतात. अन्यथा बँक दंड आकारते. निसर्गाचीही वॉटर बँक आहे. तिचेही काही नियम आहेत. जर आपण बँकेतील नियम पाळतो, तर निसर्गाने ठरविलेला दंडक का टाळतो, याचे उत्तर पाण्याची नासाडी करणाऱ्यांना तडफडत का असेना द्यावे लागेल. कारण निसर्गाचे कोर्ट खूप कठोर आहे. ते माणूस ऐकत नसल्यास कुठल्याही क्षणी त्सुनामी आणू शकते. त्यातून वाचण्यासाठी वशिलेबाजी चालत नाही. तिथे तारीख मिळत नाही, उलट थेट शिक्षा हेच ठरलेले असते.

अशा कठोर कोर्टाच्या देखरेखीखाली आपण वावरत असतानाही पाण्याची नासाडी करतो, ही बाब समजून टाळायला हवी. ‘उदक तारक उदक मारक । उदक नानासौख्यदायक । उदकाचा विवेक अलौकिक आहे ॥’ असे समर्थ रामदास स्वामी यांनी दासबोधात म्हटले आहे. त्यानुसार आपण काहीही करायला तयार नाही. नागपूर शहरात २०१८-२०१९ मध्ये पाणीबाणी निर्माण झाली होती. पहिल्यांदा पेंच प्रकल्प येथील कुंवारा भिवसेन जलाशयातील डेड स्टॉकचे पाणी नागपुरातील जनतेसाठी सोडण्यात आले होते. अशीच अवस्था महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, नाशिक, सांगली, सातारा, कोल्हापूर, संभाजीनगर, अमरावती, जळगाव, मनमाड, अकोला, वाशीम, चंद्रपूर यासह प्रत्येक शहरांतील आहे. वाढते शहरीकरण, पाण्याची नासाडी यामुळे पुढील काळात पाणी हाच मुद्दा लोकांसाठी रक्तदाब वाढविणारा ठरेल. यावर उपाय म्हणून आता घराघरात काम करणाऱ्या महिला कामगारांना पाण्याचे महत्त्व पटवून द्यायला हवे. कमीत कमी पाण्यात धुणी-भांडी कशी पूर्ण करायची याचे तंत्र त्यांना समजावून सांगायला हवे. नळ सुरू ठेवायचा आणि तासन्तास धुणी भांडी करायची हे प्रकार टाळायला हवेत. आज घरोघरी पाण्याची नासाडी सुरू आहे. विशेष म्हणजे एखाद्याने यावर विचार मांडले तर त्याला शत्रू मानले जाते किंवा राजकारण आणून पाणी वाचविण्यासाठी निघालेल्या व्यक्तीला गोत्यात आणले जाते. परिणामी तो स्वतःच कसे या संकटातून वाचायचे याचेच तंत्र समजून पाणी बचतीचा मंत्र बासनात गुंडाळून ठेवतो. आपल्या देशात नाल्यांद्वारे वाहत जाणाऱ्या सांडपाण्याचा पुर्नवापर वाढायला हवा. पूर्वी उन्हाळा येताच गावागावात टँकरद्वारे पाणी द्यावे लागायचे. त्यात आता घट झाली आहे. याकरिता जलस्वराज्य आणि मागेल त्याला शेततळे या योजना फलदायी ठरल्या आहेत. जेवढे पाणी जमिनीत जिरेल तेवढाच जलस्तर उंचावेल अन् उन्हाळ्यातही ते आपल्याला मुबलक प्रमाणात मिळेल. आजचा दिवस चांगला आहे. उद्याचाही दिवस चांगला करायचा असेल तर उन्हाळ्यात पेटणारा पाण्याचा प्रश्न पावसाळ्यात विझू न देता तेव्हाच पडणारा प्रत्येक थेंब जमिनीत कसा जिरेल यावर भर द्यायला हवा. याचा शुभारंभ प्रत्येकाने स्वतःपासून करायला हवा.

पाणी कधीच शिळे होत नसते. मात्र दररोज सकाळी घराघरांत एक दिवसांपूर्वी भरलेले पाणी दुसऱ्या दिवशी संडासात ओतले जाते. जे पाणी शिळे होत नाही, ते फेकण्याची गरज काय? भरपूर शिकलेल्या महिला आणि पुरुष ही कृती करतात. त्यांना पाहून मनात राग निर्माण होतो अन् डोळ्यात अश्रू येतात. पण हाती काहीच अधिकार नसल्याने गप्प बसावे लागते. विशेष म्हणजे शासनातर्फे पाणी बचत व्हावी याकरिता योजना तयार केल्या जातात. त्यांचा भरणा ग्रामीण भागावर अधिक असतो. मग शहरातील लोकांनी पाण्याची नासाडी करायची की काय, असाही त्यातून अर्थ काढावा का? पाणी बचतीची योजना आणायची असल्यास ती सरसकट सर्वांना लागू करायला हवी. ग्रामीण भागातील लोक सांडपाण्याचा उपयोग परसबागेत करून सकस आहार मिळवितात. शहरातील लोक नाल्याद्वारे ते पाणी सोडून आम्ही पुढारलेले असल्याचा आव आणतात. मग त्यांनी सदुपयोग करायचा आणि यांनी दुरुपयोग असा प्रकार आपणही किती दिवस खपवून घ्यायला हवा. शेवटी, आस धरा, कास धरा, पाणी बचतीचा आजपासून ध्यास धरा...! अन्यथा रणरणत्या उन्हात पाणी मिळविण्यासाठी तयार राहा.

९८८१७१७८५९

## कानोसा

# भय इथले संपत नाही

**अमोल पुसदकर**

टीसीएस नाशिक या कंपनीमध्ये झालेल्या प्रकाराला आता एक नवीन नाव मिळालेले आहे ते म्हणजे “कॉर्पोरेट जिहाद.” काही वर्षांपूर्वी जिहाद म्हणजे काय, त्याचा अर्थ काय, असे जर सर्वसामान्य हिंदू व्यक्तीला कोणी विचारले असते, तर त्याला याचा अर्थ बोध झाला नसता. हा शब्द सर्वाधिक ‘लव्ह जिहाद’मुळे प्रचलित झाला. ज्या वेळेला इस्लामचे भारतामध्ये आक्रमण झाले, त्यावेळेला गावेच्या गावे धर्मांतरित करण्यात आली. युद्धामध्ये पराभूत झालेल्या सैनिकांना धर्मांतरित करण्यात आले. त्यांच्या महिलांना सैनिक आणि सरदारांमध्ये आपसात वाटून घेणे हीच त्यांची धर्म आज्ञा होती; त्यामुळे तसेच झाले. काही शतके हे अत्याचार सुरू होते. पुढे परिस्थिती पालटली, बादशहांच्या बादशाह्या उलथवल्या गेल्या आणि त्यानंतर हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. जिहाद्यांना व त्यांच्या कारवायांना लगाम बसला. पुढे इंग्रज आले, त्यांनी पण आपले धर्मांतरणाचे प्रयत्न शांती आणि सेवेच्या माध्यमातून सुरूच ठेवले. देश स्वतंत्र झाल्यावर संविधानाचे राज्य आले; त्यामुळे असे सर्व प्रयत्न संपतील असे वाटले, परंतु जिहादी मानसिकतेपुढे कायदे तकलादू आणि कुचकामी ठरले का असा प्रश्न पडतो.

कधी दहशतीच्या माध्यमातून, तर कधी प्रलोभनाच्या माध्यमातून, कधी प्रेमाच्या जाळ्यात अडकवून, तर कधी बहुसंख्येचा दबाव तयार करून, धर्मांतरणाचे हे प्रयत्न भारतामध्ये अनेक वर्षांपासून सुरू आहेत. बरेचदा यांच्या या सर्व प्रयत्नांचा बळी प्रामुख्याने महिला राहिलेल्या आहेत. परंतु आपली बदनामी होईल या भीतीने अनेक वेळा महिला तक्रार करायला समोर येत नाहीत, कारण त्यांना माहीत असते की आपली न्यायव्यवस्था आणि प्रशासन यांच्या भरवशावर आपण हे पाऊल उचलू शकत नाही. एखादा खटला किती वर्षे चालेल, त्यामध्ये किती वर्षे आपल्याला न्यायालयाचे हेलपाटे घालावे लागतील, या दरम्यान आरोपींकडून आपल्या जीवाला धोका होण्याचा संभव हा नेहमीच कायम राहील; त्यामुळे शक्यतो त्या तक्रार देत नाहीत.

मागे उत्तर प्रदेशमध्ये एका जिम ट्रेनरकडून अशा पद्धतीचा जो प्रयत्न झाला होता, त्यामध्ये बळी असलेल्या ५५ महिलांपैकी फक्त एक महिला तक्रार द्यायला समोर आली. यातून आपल्याला परिस्थितीची जाणीव होऊ शकते. २०२६ मध्ये समाजाची जर ही मानसिकता असेल, त्यांच्या मनामध्ये कायद्याबद्दल विश्वास नसेल, तर अजून खूप काम करणे बाकी आहे असे आपल्या लक्षात येते.

आज हजारो कंपन्यांमध्ये महिला या विविध निमित्ताने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे काम करीत असतात. अनेक वेळा सोबत काम करणाऱ्या लोकांकडून, ठेकेदाराकडून, कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून शोषणाचे अनेक प्रकार घडत असतात, परंतु त्याला धार्मिक किनार नसते. शोषण करणारा तिच्या धार्मिक स्वातंत्र्याच्या मध्ये येत नाही, तिच्या देवी-देवतांना काही बोलत नाही; त्यामुळे समाजामध्ये एखादी व्यक्ती वाईट आहे एवढीच भावना निर्माण होते. परंतु या प्रकरणांमध्ये मात्र टीसीएससारख्या नामांकित कंपनीत हा प्रकार व्हावा, हे रतन टाटांच्या आत्म्याला सुद्धा दुःखदायकच वाटत असेल. ज्या टाटा समूहाने इतकी मोठी प्रतिष्ठा कमावलेली आहे, त्यांच्याच कंपनीमध्ये असे प्रकार होणे ही संपूर्ण समूहाकरिता लाजिरवाणी गोष्ट आहे. इतरही कंपन्यांनी यापासून धडा घेण्याची आवश्यकता आहे. त्यांनी बनविलेल्या समित्या या कुचकामी ठरत असेल, तर त्यांची सिस्टिम म्हणजे व्यवस्था बरोबर नाही हे लक्षात येईल. कंपनीमध्ये घडणाऱ्या अशा गोष्टींना शोधणे, पीडितांना न्याय देणे हे जर काम कंपनी व्यवस्थापन करू शकत नसेल, तर ते आकाशात उडण्याचे व चंद्रावर जाण्याचे स्वतःचे स्वप्नही ते साकार करू शकणार नाहीत; हेही तेवढेच खरे आहे.

एका विदेशी प्रसिद्ध वृत्तवाहिनीने नेहमीप्रमाणे बातमीचा रंग पूर्णपणे बदलून वृत्त दिलेले आहे. त्यांनी पीडित लोकांच्या नातेवाईकांचे किंवा कंपनीतील इतर कर्मचाऱ्यांचे अभिप्राय सांगितलेले नाहीत, तर आरोपीच्या बायकोचा अभिप्राय सांगितलेला आहे. पीडितांची बाजू काय आहे हे सांगितलेले नाही, तर आरोपींचे वकील काय म्हणतात हे सांगितलेले आहे.

आज महाराष्ट्रातील आणि देशातील मानवाधिकार कार्यकर्ते व शनि मंदिरात आम्हाला प्रवेश मिळालाच पाहिजे, शबरीमलामध्ये आम्हाला प्रवेश मिळालाच पाहिजे अशा पद्धतीच्या गोष्टी आणि आंदोलन करणारे त्या प्रकरणावर चूप आहेत. पुरोगामी लोकांचे राजकीय नेते सुद्धा चूप आहेत. सर्वसामान्य जनतेने हे ओळखण्याची आवश्यकता आहे की मोठमोठी प्रतिष्ठित वृत्तपत्रे, टीव्ही वाहिन्या, ठरावीकच वेळी ओरडणारे नेते हे वास्तविकपणे हिंदू समाजाचे नेते नाहीत. यांच्या धार्मिक निष्ठा हिंदू धर्माबद्दल बिलकूल नाहीत. यांची नावं हिंदू जरी असली, तरी हिंदुत्व यांच्यात बिलकूल नाही. ते कोणत्याही पक्षाचे असो, परंतु हिंदुत्वाबद्दल कुचकामी पुळचट भूमिका घेणाऱ्या नेत्यांना जनतेने ओळखणे आणि हळूहळू त्यांना अस्ताकडे नेणे आवश्यक आहे.

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे उघडकीस आलेला लैंगिक शोषणाचा प्रकार हा १०० टक्के लव्ह जिहादच आहे, असे म्हणावे लागेल. या प्रकरणात शेकडो मुलींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून त्यांचे शोषण करणारा, त्यांचे बदनामी करणारे फोटो आणि व्हिडीओ काढणारा अयान अहमद व त्याच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केलेली आहे. हे सर्व एकाच धर्माचे आहेत, त्यावरून सुद्धा त्यांची धार्मिक मानसिकता आपल्या लक्षात येते. काँग्रेसच्या एका महिला नेत्याने म्हटले की याला धार्मिक रंग देण्यात येऊ नये.

टीसीएसमधील एक महिला चार वर्ष सर्व अत्याचार सहन करते. त्यांना समाजामध्ये कोणाला काही सांगावे असे वाटत नाही. स्वतःची बदनामी आणि नोकरी यामुळे कदाचित त्या असं करीत नसाव्या; परंतु समाजामध्ये अशा काही व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, संघटना नसाव्यात का, ज्यांच्याकडे अशा पीडित महिला स्वतःची आपबीती सांगून न्यायासाठी मदत मागू शकते याचा विचार समाजाने करणे आवश्यक आहे. अयान अहमदला कायदा जी शिक्षा करेल ती करेल, परंतु शेकडो मुलींना अशा पद्धतीचे लोक कसे काय फसवू शकतात याचाही विचार करणे गरजेचे आहे. घरातील संस्कार, शाळांमधील शिक्षण, सामाजिक प्रबोधन कमी पडत आहे याचेच हे लक्षण आहे. या दोन्ही प्रकरणांना घेऊन सामाजिक संस्था, कार्यकर्ते यांनी मुला-मुलींचे प्रबोधन करण्यासाठी शाळा, कंपनी इत्यादी ठिकाणी जाणे गरजेचे आहे. घटना घडत असतात, परंतु प्रत्येक वेळेस स्वतःला ठेच लागल्यावर शहाणे होणे हे काही बरोबर नाही; इतरांना लागलेल्या ठेचा बघून समाजाने शहाणे होणे गरजेचे असते.


९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### आयटी कंपन्यांतील कर्मचारी कपातीचा निर्णय चिंताजनक

अलिकडेच एका अमेरिकन आयटी कंपनीने तीस हजार कर्मचारी कमी करण्याचा निर्णय घेतला. ज्यात बारा हजार कर्मचाऱ्यांमध्ये भारतीयांचाही समावेश आहे. ही नामवंत कंपनी भरपूर नफा कमावत असल्याची आकडेवारी असूनही नोकर कपातीचा निर्णय का घेतला असावा असा प्रश्न निर्माण होतो. एखाद्या तोट्यात असलेल्या कंपनीने असे निर्णय घेणे योग्य ठरू शकते. परंतु प्रचंड नफा कमावत असलेल्या या आयटी कंपनीकडून कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड संगणन आणि डेटा सेंटर्स यासारख्या क्षेत्रात मोठी गुंतवणूक सुरू होती. यावरून तंत्रज्ञानाचे बदलते स्वरूप भयावह रूप धारण करत असल्याचे दिसून येते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित प्रणालीमुळे अनेक क्षेत्रांतील कामांचा वेग वाढत चालला आहे. त्याचबरोबर



लोकांच्या साहाय्याने कामे पूर्ण केली जात आहेत. परिणामी मोठमोठ्या कंपन्यांना अवाढव्य खर्च कमी करून त्यांना कार्यक्षमतेकडे वळवले जात आहे. आयटी कंपन्यांमध्ये होत असलेला हा मानसिक बदल यापुढील काळात केवळ रोजगारापुरता मर्यादित राहणार नाही. तर त्याचे मोठे पडसाद आपल्या सामाजिक जीवनातही उमटतील असे दिसत आहे. कारण नोकऱ्या कमी झाल्यामुळे बेरोजगारांच्या आयुष्यात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होऊ शकते. शिक्षणासाठी लाखो रुपये खर्च करूनही मोठ्या आयटी कंपन्यांमध्ये नोकऱ्यांची संधी नसेल तर लोकांचा शिक्षणावरचा विश्वासच डळमळीत होऊ शकतो. नोकऱ्या नसल्यामुळे बेरोजगार तरुणांचे वैवाहिक जीवनही लांबणीवर पडत जाऊ शकते किंवा अडचणीत येऊ शकते. आपल्या वृद्ध पालकांची

कंपन्या बदलत जाण्याचा ट्रेंड प्रचलित आहे. त्यामुळे धावपळीच्या किंवा धकाधकीच्या जीवनातील अनिश्चितता वाढीस लागली आहे. आजच्या काळात समाजाने नवनव्या समस्यांना तोंड देण्याची तयारी दाखवली पाहिजे. मोठ्या कंपन्या पूर्वसूचना न देता नोकऱ्या कमी करीत सुटलेल्या असताना तसेच यामुळे तरुण नोकरदारांचा आर्थिक आधार हिरावत चालल्याने सरकारपुढेही नवे प्रश्न निर्माण होत आहेत. यावर ठोस उपाययोजना करणे काळाची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

शिरकाव झाला आहे’ असे ते म्हणाले. याचा अर्थ असा होतो की, शिरकाव झालेले असे तथाकथित प्रतिगामी सोडून सारे वारकरी आधीपासूनच पुरोगामी आहेत, आणि हे शरद पवार यांना मान्य आहे. “विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥” हा संत तुकाराम महाराजांचा अभंग मानवी समतेचा आणि विश्वबंधुत्वाचा पाया आहे.

प्रतिगामी आणि पुरोगामी या शब्दांचे अर्थ स्पष्ट व्हायला हवेत. अन्यथा कालपर्यंत प्रतिगामी वाटणारे वारकरी अचानक साक्षात्कार झाल्यासारखे पुरोगामी वाटायला लागले आहेत. मला वाटते, “ज्याने भेदाभेदांचे जोखड झुगारून दिले आहे आणि जो सर्वांना समानतेची वागणूक देतो तो पुरोगामी” अशी सुटसुटीत व्याख्या जर केली तर, आता वारीत असे कोण लोक घुसले आहेत की, ज्यांना समानता नको आहे आणि भेदाभेद आणायचा आहे?

शरद पवार यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी वारीमध्ये प्रत्यक्ष

दिसत नाही, शिवाशिव दिसत नाही. सर्व वारकरी वारीत एकत्र राहतात, एकत्र जेवतात, एकत्र झोपतात. कोणासाठीही कोठेही वेगळी व्यवस्था नसते. कोणाला कोणाचा कधी विटाळ होत नाही. मग असे प्रतिगामी दिसले तरी कुठे? उगाच लोकांची दिशाभूल करायची, प्रत्यक्ष परिस्थितीच्या विपरीत काहीतरी बडबडायचे आणि नवीन वादंग निर्माण करायचे हा काही लोकांचा धंदाच होऊन गेला आहे. परंतु आता सगळा हिंदू जागा झाला आहे. तो अशा भूलथापांना कधीही बळी पडणार नाही. असा कोणी तथाकथित ‘प्रतिगामी’ वारीत घुसलाच तर त्याला सुद्धा हे पुरोगामी वारकरी सामावून घेतील व आपल्या सारखा ‘पुरोगामी’ करून टाकतील याविषयी काही शंकाच नाही.

**सुहास कुलकर्णी**/पिंपरी पुणे

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## बीड नगर पालिकेचे इंजि. किरण देशमुख, गणेश पगारे, प्रमोद माने यांच्याविरुद्ध निलंबनाच्या कारवाईचा प्रस्ताव पाठवला

# कोणीही असो चुकीला माफी नाहीच : नगराध्यक्षा प्रेमलतातार्ई पारवे

**तभा. वृत्तसेवा**

**बीड ( प्रतिनिधी )** | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवातील मिरवणुकीत कचखडी आणि रस्त्यावर अचानक आलेल्या पाण्यामुळे मोठी गैरसोय झाली होती. या प्रकरणात नगरपालिकेने बांधकाम विभागातील इंजि. किरण देशमुख, स्वच्छता विभाग प्रमुख गणेश पगारे आणि पाणीपुरवठा विभागाचे प्रमोद माने या तिघांना नोटीस बजावली होती. सदरील नोटीसचे खुलाशे संबंधितांनी सादर केले आहेत मात्र ते समाधानकारक नसल्याने आणि त्यांच्याकडून गंभीर चूक झाल्याने इंजि. देशमुख यांच्यासह पगारे, माने या तिघांविरुद्ध नगराध्यक्षा यांच्या आदेशावरून मुख्याधिकाऱ्यांनी निलंबनाच्या कारवाईचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासनाचे सह आयुक्त यांच्यामार्फत आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांच्याकडे पाठवला आहे. दरम्यान या संदर्भात वरिष्ठ स्तरावर प्रशासकीय पाठपुरावा करण्यात येणार आहे. दोषीवर कारवाई करण्यात येणार असून चुकीला माफी नसल्याचे नगराध्यक्ष प्रेमलतातार्ई पारवे यांनी स्पष्ट केले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव मिरवणुकीच्या अनुषंगाने विविधि प्रकारच्या उपाययोजना करणेबाबत आदेश निर्गमीत करण्यात आले होते. परंतु रस्त्यावर टाकण्यात आलेल्या कचखडीमुळे तसेच मिरवणूकी दरम्यान रात्री ९.३० नंतर मिरवणूक मार्गावर एका ठिकाणी अचानक घाण पाणी आल्यामुळे नागरीकांना त्रास सहन करावा लागला. सदरील गैरसोयीबद्दल नगर पालिकेने बांधकाम विभाग प्रमुख इंजि. किरण देशमुख,पाणी पुरवठा विभाग प्रमुख प्रमोद माने तसेच स्वच्छता विभाग प्रमुख गणेश पगारे यांना नोटीस बजावली.

# माजलगाव येथील बालाजी मंदिरात 'जिज्ञासा' समरकँप उत्साहात संपन्न

**तभा. वृत्तसेवा**

**माजलगाव** | प्रतिनिधी: शहरातील बालाजी मंदिरामध्ये माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने लहान मुलांसाठी १० दिवसीय 'जिज्ञासा' समरकँप उत्साहात पार पडला. " न कोई पहला, न कोई आखिरी, हर चमक है जरूरी " या अभिनव संकल्पनेवर आधारित या शिबिरात स्पर्धाविरहित वातावरण ठेवण्यात आले होते. त्यामुळे प्रत्येक मुलाला मोकळेपणाने आपली कला, कल्पकता आणि सहभाग व्यक्त करण्याची संधी मिळाली.

या समरकँपचे आयोजन मंडळाच्या अध्यक्षा अलकनंदा मानधने, सचिव अनिता मुंदडा, कोषाध्यक्ष सुरेखा जेथलीया, सहसचिव सुगना तेला, सहकोशाध्यक्ष किरण कासट व संघटन मंत्री रत्नमाला इंदाणी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.




दररोजच्या सत्राची सुरुवात श्लोक व प्रार्थनेने होत होती. रत्नमाला इंदाणी यांनी विविध गाण्यांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, पाणी बचत, आरोग्यदायी आहार, प्लास्टिकमुक्ती, "जगा आणि जगू द्या" यांसारख्या मूल्यांवर मुलांना मार्गदर्शन केले. डॉ.सौ. राधिका बजाज व सौ.अनिता लोहिया यांनी ध्यान, योग व झुंबा नृत्याचे प्रशिक्षण दिले. कुमारी मानसी मानधने यांनी आर्ट अँड क्राफ्टचे मार्गदर्शन केले, तर प्रियंका भुतडा, अंकिता भुतडा, जयश्री लड्डा, सुप्रिया मालानी व सेजल मुंदडा यांनी बोधकथा व विविध खेळांद्वारे मुलांचे मनोरंजन व शिक्षण केले.

सौ.भाग्यश्री करवा यांनी गमतीशीर विज्ञान प्रयोग सादर करून मुलांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण केली. डॉ.सौ. करुणा मोदाणी यांनी मुलांची नि:शुल्क आरोग्य तपासणी केली. शिबिरादरम्यान रोज विविध अन्नदात्यांकडून मुलांसाठी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. स्नेहल कासट यांनी संपूर्ण शिबिराचे व्हिडिओ चित्रीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नमाला इंदाणी यांनी केले. यावेळी तालुका माहेश्वरी सभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष विनोद बजाज, सचिव पुरूषोत्तम करवा, ज्येष्ठ समाजसेवक गोपीकिशन इंदाणी, डॉ.सुशील लोढा, विष्णुदास मुंदडा, सचिन रेहदासनी व डॉ.सौ.निर्मला बजाज यांची प्रमुख उपस्थिती होती.

# 150 विद्यार्थ्यांची झाली मोफत कल चाचणी, रोटरी क्लब व कॉम्प्युटर वर्ल्ड चा उपक्रम

**तभा. वृत्तसेवा**

**अंबाजोगाई** | विद्यार्थ्यांचे पुढील भवितव्य नेमके कोणत्या क्षेत्रात आहे. याची अचूक माहिती कल चाचणी (करियर इंक्लिनेशन टेस्ट) या माध्यमातून उलगडते. यासाठी १५० गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची हि चाचणी रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व कॉम्प्युटर वर्ल्ड यांच्या वतीने घेण्यात आली.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत उपयुक्त असा करिअर कलचाचणी उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी, क्षमता व योग्य करिअर क्षेत्र याबाबत मार्गदर्शन करणे तसेच त्यावर समुपदेशन सत्र घेणे हा होता.या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मागील तीन दिवसांपासून सहभाग नोंदविला. सर्व विद्यार्थ्यांची चाचणी घेऊन त्यांचे सविस्तर रिपोर्ट तयार करण्यात आले.

**विद्यार्थ्यांना त्यांच्या आवड, क्षमता व करिअर निवडीबाबत मार्गदर्शन** | प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक रिपोर्ट कार्ड देण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांना रिपोर्ट वितरण करण्यात आले.विद्यार्थ्यांनी या संधीचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. या विद्यार्थ्यांची चाचणी व त्यांना मार्गदर्शन कॉम्प्युटर वर्ल्डचे संचालक प्रा.संतोष मोहिते यांनी केले.या प्रसंगी, रोटरी क्लबच्या अध्यक्षा यांनी विद्यार्थ्यांना या कल चाचणीचे महत्त्व व फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले . भविष्यातील निर्णायक क्षमता वाढण्यास मदत होते यावर सांगितले. तसेच,करिअर निवडीसंबंधी दिशा देत त्यांना प्रोत्साहित केले.करिअर निवडीसाठी योग्य दिशा देणारा हा उपक्रम भविष्यातील यशस्वी आयुष्याची पायाभरणी करणारा वर्कशॉप ठरला.यावेळी रुपेश रामावत,प्रा. अजय पाठक, धनराज सोळंकी, यांची उपस्थिती होती.

# बीडमध्ये उसळला भीमसागर : आनंद शिंदेंच्या भीम गीतांत न्हाऊन निघाले बीडकर

**तभा. वृत्तसेवा**

**बीड दि.१९ (प्रतिनिधी)** | महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त रविवारी झालेल्या आनंद शिंदे यांच्या भीम गीतांच्या कार्यक्रमास भीमसागर उसळला. यावेळी आनंद शिंदेंनी सादर केलेल्या भीम गीतांत बीडकर न्हाऊन निघाले.

बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली रविवारी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. दरम्यान सायंकाळी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे ख्यातनाम लोकगायक आनंद शिंदे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास बीड शहर व परिसरातील भीम सैनिकांनी अलोट गर्दी केली. यावेळी भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला अभिवादन करून भीम गीतांच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. गायक आनंद शिंदे यांनी एकाहून एक भीम गीतं सादर करत उपस्थित भीमसैनिकांच्या भावनांना हात घातला.

### आ. संदीप क्षीरसागर यांचे चोख नियोजन आणि भीमकन्यांचा सन्मान!

महापुरुषांच्या जयंतीत जीव ओतून काम करण्यासाठी सर्वदूर परिचित असलेले आ. संदीप क्षीरसागर यांनी भीम गीतांच्या कार्यक्रमाचे चोख नियोजन केले होते. विशेष म्हणजे आ. क्षीरसागर यांच्या नियोजनातून या कार्यक्रमास उपस्थित सर्व भीम कन्यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला.

# जय परशुराम च्या घोषणाने केज शहर दणाणले,शोभायात्रेत भगव्या शाली

## भगवान परशुरामाच्या बाबतीत अनेक चुकीच्या गोष्टी पसरवल्या - ह.भ.प.लक्ष्मण महाराज इनामदार

**तभा. वृत्तसेवा**

**केज** | प्रतिनिधी

केज शहरामध्ये भगवान परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.जय परशुराम घोषणेने शहर दणाणले तसेच भगव्या शाली व टोप्या समाज बांधवांनी परिधान केल्याने भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. भव्य मिरवणूक मोटरसायकल रॅली व्याख्यान आरती प्रसाद व जय परशुरामच्या घोषणाने केज शहरात भगवान परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. तसेच यशस्वीविद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला व रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. शनिवार दि.१८ एप्रिल रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते

अशा विविध उपक्रमाने भगवान परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा झाला. शोभायात्रेत सर्व महा पुरुषांच्या चौकांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.केज शहरात भगवान परशुराम जन्मोत्सव रविवार दिनांक १९ रोजी अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर साजरा करण्यात आला यावेळी वकीलवाडी हनुमान मंदिरापासून भगवान परशुरामाची भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली यावेळी भगवान परशुराम यांच्या शोभायात्रे सोबतच मंत्रोच्चार करण्यात आले वकीलवाडी हनुमान मंदिर ते बालाजी मंदिर या पूर्ण वेळात शांतीपाठ तसेच वेदोक्त मंत्र चार श्री सूक्त आधीचे पाठ करण्यात आले तसेच भव्य मोटारसायकल रॅली भगवान परशुरामांच्या शोभा यात्रा प्रतिमेसह संपूर्ण शहरात साजरी करण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करत पुष्पहार अर्पण करण्यात आला तेथून पुढे संत भगवान बाबा चौकात संत भगवान बाबांचा जय घोष करत पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# बालेपीर भागातील मूलभूत समस्यांची पाहणी; लवकर निराकरणाचे आश्वासन

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | शहरातील बालेपीर परिसरातील विविध मूलभूत समस्यांच्या अनुषंगाने आज प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्ष प्रतिनिधी मुजीब भाई, तसेच स्वच्छता व आरोग्य सभापती निजाम शेख यांच्यासह स्थानिक नगरसेवक राजाभाऊ गुजर, आयुब भाई व खय्युम भाई उपस्थित होते.

पाहणीदरम्यान परिसरातील प्रमुख समस्या असलेल्या रस्ते, लाईट व नाले या बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांनी मांडलेल्या अडचणी लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना आश्वासन दिले की, बालेपीर भागातील सर्व प्रश्न प्राधान्याने हाताळून लवकरात लवकर सोडविण्यात येतील.

याप्रसंगी जमील खान, अकबर खान, इरफान शेख, युसुफ भाई, सोहेल खान, अवेज खान, सुजन खान, अन्वर भाई, खलील भाई यांच्यासह परिसरातील समस्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थानिक नागरिकांनी देखील प्रशासनाकडून तातडीने कामे पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# उदगीरमध्ये अंबाजोगाईच्या प्रतिनिधींचा गौरव; लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात उत्साहात सत्कार

**तभा. वृत्तसेवा**

**अंबाजोगाई** | उदगीर येथे आयोजित अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या अधिवेशनाच्या निमित्ताने अंबाजोगाई येथून उपस्थित राहिलेल्या पत्रकार व प्रतिनिधींचा येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमामुळे पत्रकारांमध्ये स्नेहबंध दृढ होण्यासोबतच विचारांची



देवाणघेवाण करण्यास एक उत्तम व्यासपीठ मिळाले.

कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील प्राध्यापक कंगळे सर, मातेकर सर तसेच इतर शिक्षकांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून त्यांचा शाल-श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी पत्रकारिता क्षेत्रातील बदलते प्रवाह, सामाजिक जबाबदाऱ्या तसेच वर्तमान घडामोडींवर सखोल चर्चा करण्यात आली.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार पुनम परदेशी (दै. परळी प्रहार), मुशीर बाबा (दै. जगमित्र), वासुदेव शिंदे (दै. चंपावती पत्र), कुलकर्णी एम. (आकाशवाणी औरंगाबाद), मातेकर (तरुण भारत), दत्तात्रेय अंबेकर (दै. झुंजार नेता), विरेंद्र गुप्ता (बीड संकेत), संजय रानभरे (दै. सकाळ), सय्यद नयीम (रण झुंजार), अशोक दळवे (दै. अतुल्य महाराष्ट्र), प्रशांत मस्के (दै. बीड सत्ता), व्यंकटेश जोशी (दै. न्याय टाइम्स) आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थितांनी एकमेकांशी संवाद साधत पत्रकारितेतील अनुभव शेअर केले. स्नेहपूर्ण वातावरणात सर्वांनी एकत्र येत छायाचित्र टिपत हा क्षण संस्मरणीय केला.

हा सत्कार सोहळा केवळ औपचारिक न राहता पत्रकारांमधील ऐक्य, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करणारा ठरला.


### दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई

मुख्य कार्यालय- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७
ऑफिस पत्ता:- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७

जा.क्र. दीन/मु.का./वसुली/१७/७००२-७६/०५/२०२६-२७ दिनांक- १८.०४.२०२६

परिशिष्ट ४ अ
नियम ८ व ९ नुसार

**मालमत्ता विक्रीची सुचना**
विक्री नोटीस (अचल मालमत्ता)

सिक्युरिटायझेशन आणि सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी कायदा २००२ अंतर्गत नियम ८ व ९ नुसार या नोटीसद्वारे सर्वसाधरण लोकास तसेच कर्जदार व सहकर्जदार/गहाणदार व जामीनदार यांना सुचित करण्यात येते की, खालील वर्णन केलेली अचल मालमत्तेचे गहाणखत बँकेच्या नावे कर्जाची परतफेड करण्याची हमी देवुनही **१.कर्जदार** मे. ज्ञानेश्वर माऊली बेकरी प्रोप्रा. दिनेश रमाकांत मोरे (कर्जदार) **पत्ता:-** रमाकांत मोरे, एम.आय.डी.सी., करीमपुरा, शुक्रवार पेठ, बीड जि.बीड ४३१ १२२ **२.जामीनदार** श्री. अमोल अर्जुनराव गोंडगे **पत्ता:-** गणपती मंदीर, शुक्रवार पेठ, बीड,जि.बीड ४३१ १२२ **३.जामीनदार** श्री. महादेव मुरलीधर खनके **पत्ता:-** मुरलीधर खनके, माळकिणी, मंठा, जि. जालना ४३१ ५०४ **४. जामीनदार** सौ. सोनाली दिनेशराव मोरे **पत्ता:-** दिनेशराव मोरे, गौरव व्यायाम शाळा, शुक्रवार पेठ, बीड, जि.बीड ४३१ १२२ **५. जामीनदार** रफीक मोहम्मद हुसेन शेख **पत्ता:-** मोहम्मद हुसेन शेख, करंजा रोड, बुंदलपुरा, बीड,जि.बीड ४३१ १२२

सदर कर्जदार/गहाणदार यांनी दिनांक **०९.०९.२०२४** रोजी दस्त क्र.४४९३/२०२४ रु.१,९०,००,०००/-(अक्षरी रु.:- एक कोटी नव्वद लाख रु. फक्त) चे गहाणखत बँकेच्या नावे करुन दिले आहे. निम्न लिखीत मालमत्तेचा ताबा दिनांक ०९.१२.२०२५ रोजी घेतला आहे.

वर नमुद केलेल्या कायद्यांतर्गत नियमानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी, खालील वर्णनाचे गहाण स्थावर मालमत्तेची निविदाद्वारे विक्री करण्याकरीता नोटीस देत आहे. बँकेनी खालील गहाण स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करण्याकरिता सिल बंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. दिनांक **३१.०३.२०२६** रोजी थकीत रक्कम **रु. १,६५,९१,३४६.७०/-(अक्षरी रु.एक कोटी पासष्ट लाख एक्यानव्व हजार तीनशे शेहचाळी रु. सत्तर पैसे )** अधिक पुढील व्याज व इतर खर्च बाकी असलेल्या वसुली करिता निविदा मागविण्यात येत आहे.

ज्या कुणास खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निवीदा प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-बीड या पत्यावर सिलबंद पाकीटमध्ये अनामत रक्कम राशी रु.२५०००/- (प्रत्येकी मालमत्ता) प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा **बीड** यांच्या नावे असलेला डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर जोडुन दिनांक १८.०५.२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे.

**गहाण मालमत्तेचा तपशील:-**

**मालमत्ता मालक:- रफीक मोहम्मद हुसेन शेख**
ग्रामपंचायत वासनवाडीच्या अधिकार क्षेत्रात जमीन मालमत्तेचे पुर्ण मालक आहेत सर्वे क्र.१०९ घर क्र.३७३५ एकुण क्षेत्रफळ १२०० स्वे.मी.०.१३.८३ आर वासनवाडी जि.बीड येथे स्थित आहे ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:-
**पुर्व:-** लोढा यांची जमीन **पश्चिम:-** २० फुट रुंद रस्ता
**दक्षिण:-** ४० फुट रुंद रस्ता **उत्तर:-** लियाकत मोहम्मद हुसेन यांचा प्लॉट/जागम्मद हुसेन यांचा प्लॉट/जागा
(वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत)

**मालमत्ता राखीव किंमत रु.२,४३,००,०००/-(अक्षरी रु.: दोन कोटी त्रेचाळीस लाख रु. फक्त)**
**(मालमत्ता अपेक्षीत किंमत रु.२,७५,००,०००/-) (अक्षरी रु. दोन कोटी पंच्याहत्तर लाख रु.फक्त)**
**अनामत रक्कम रु.२५०००/- (अक्षरी रु.:-**पाच हजार फक्त).

**विक्रीच्या शर्ती व अटी:-**

१. इच्छुक खरेदीदारांना कोरे निविदा पत्र रु.१००/- (अक्षरी रु.- शंभर रु. फक्त)अधिक जीएसटी नगदी अथवा डिमांड ड्राफ्ट ने जमा करुन बँकेच्या शाखा-बीड शाखेतुन प्राप्त करता येईल.
२. ईच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या मोहरबंद निविदा सुरक्षा राशी रु. २५,०००/- (अक्षरी रु.- पंचेविस हजार रु. फक्त) प्रत्येकीचा (डिमांड ड्राफ्ट/नगदी स्वरुपात/ACCOUNT TRANSFER/ अधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई या नावाचा) सह बँकेच्या शाखा कार्यालय, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-**बीड** येथे दिनांक १८.०५.२०२६ सायं.०५.०० पर्यंत जमा कराव्यात.
३. मोहरबंद निविदा विहीत सुरक्षा राशी रु. २५,०००/- (अक्षरी रु.- पंचेवीस हजार रु फक्त) नसल्यास जमा केलेल्या निविदा तात्काळ रद्द करण्यात/समजण्यात येतील.
४. विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या सर्व मोहरबंद निवीदा दिनांक २०.०५.२०२६ रोजी दुपारी ०१.०० ते ०५.०० या वेळेत बँकेच्या शाखा-बीड येथे उघडण्यात येतील.
५. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल व तो/ती/ते तसे न करु शकल्यास इतर सक्षम खरेदीदारास सदर मालमत्ता विकत घेण्याचा अधिकार प्राप्त होईल व अशा खरेदीदारास सुध्दा बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल.
६. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेची उर्वरित ७५ टक्के रक्कम त्यापासुन १५ दिवसाचे आत जमा करावी लागेल. जर १५ वा दिवस हा सुट्टीचा दिवस असेल तर त्याच्या दुस-या दिवशी पर्यन्तचा दिवस विहीत कालावधी समजण्यात येईल.
७. सदर मालमत्तेवर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा, कर, ई. वा इतर देणे बाकी असल्यास त्याची खालील हस्ताक्षराकर्तास कल्पना नाही व अशी सर्व रक्कम यशस्वी खरेदीदारांसच द्यावी लागेल व त्यास खालील हस्ताक्षरकर्ता अधिकारी जबाबदार राहणार नाही.
८. अधिकृत अधिकारी कुठलेही कारण न देता बोली/निविदा स्विकार/अस्विकार करण्याचा/संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा त्यानंतरही विक्रीची कारवाई तहकुब/स्थगीत रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवीत आहे.
९. मालमत्ते संदर्भातील चौकशी करीता बँकेच्या शाखा कार्यालय,बीड वेळ सकाळी ११.०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत संपर्क करता येईल तसेच अधिकृत अधिकारी यांना दुरध्वनी क्र. ७६६६५७७९९०० पत्ता शाखा-बीड मो.क्र.९०४९९९८२७६ वर सुध्दा संपर्क साधता येईल.
१०. नियमाप्रमाणे विक्रीपत्रा करीता लागणारा मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर सर्व खर्च यशस्वी खरेदीदारास/बोलीकर्त्यासच करावा लागेल.
११. सदर मालमत्तेवर कर्जदाराचे कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष देणे निघाल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही.
१२. कुठल्याही करणाने मालमत्ता विक्रीस विलंब झाल्यास अथवा विक्री प्रक्रिया रद्द झाल्यास निविदा रक्कमेपोटी भरलेल्या रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज परतावा केला जाणार नाही.

स्थळ:- बीड
दिनांक:-१८.०४.२०२६

अधिकृत अधिकारी,(सिक्युअर्ड क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
मो. ७६६६५७७९९००


# कुंडली...

राजकारणाच्या आखाड्यात दोनदा उतरलो,दोन्ही वेळा विजयाने हुलकावणी दिली.एकदा नियतीने 'दैवी चिठ्ठी'च्या रूपाने घात केला,तर दुसऱ्या वेळी माझ्याच काही अविचाराने घात झाला.आजच्या काळात 'राजकारण' आणि 'स्वार्थ' ही एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्या आहेत,हे सर्वसामान्य माणसाने गृहीत धरलंय; आणि त्यात त्याची तरी काय चूक? सध्याची परिस्थितीच इतकी गढूळ आहे की,तत्त्वांची भाषा आता बाळबोध वाटू लागली आहे. पण मला मात्र तो 'स्वार्थ' कधी साधता आलाच नाही.माझं आयुष्य म्हणजे 'घरच्या भाकरी खायच्या आणि मामाच्या बकऱ्या चारायच्या' असंच राहिलं.

माझी ही अवस्था पाहून माझ्या काही हितचिंतक मित्रांचा जीव तीळ-तीळ तुटत होता.ते म्हणायचे, "एक तर या राजकारणातून स्वतःचं उखळ पांढरं करून घे, नाहीतर हा नाद सोडून दे." मी दोन्ही प्रयत्न केले, पण ना मला स्वार्थी होता आलं, ना हा जनसेवेचा छंद सोडता आला. शेवटी, माझ्या या अवस्थेवर इलाज म्हणून मित्रांनी एक 'युक्ती' लढवली. वरती घाटावर एका दुर्गम खेड्यात एक निवृत्त शिक्षक आहेत, जे कुंडलीवरून भविष्य सांगतात अशी त्यांची ख्याती. योगायोगाने मित्राच्या गाडीतून तिथे जाण्याचा बेत ठरला.दोन तासांचा नागमोडी प्रवास संपवून आम्ही दुपारी एकच्या सुमारास त्या गावात पोहोचलो.गावाच्या नावापुढे 'आदर्श गाव' ही पाटी होती,पण गावाचं रूप मात्र जुनं,घरं आमच्या घरासारखीच धाब्याची आणि माढीची होती. मास्तरांची प्रसिद्धी इतकी की घर शोधायला कोणाला विचारावं लागलं नाही.

घराबाहेर चपलांचा जो प्रचंड ढीग पडला होता,तो पाहून काळजात धस्स झालं.मनात आलं, 'बाप रे! या जगात दुःखी आणि त्रस्त लोकांची संख्या किती अफाट आहे.' तरीही, संघशिस्तीचे संस्कार पुसले गेले नव्हते; मी माझी चप्पल व्यवस्थित कोपऱ्यात जोडून ठेवली आणि आत पाऊल टाकलं.

आतलं दृश्य म्हणजे जणू एक 'दुःखाचा दरबार' भरला होता.मास्तर एका फिरत्या खुर्चीवर बसले होते आणि समोर त्यांच्याच वयाचा एक जुनापुराणा कॉम्प्युटर होता. मी कोपऱ्यात बसून लोकांचे चेहरे वाचू लागलो.कुणी महिला पतीच्या भविष्यासाठी व्याकुळ होती,तर कुणी तरुण रोजगारासाठी डोळ्यात आशा घेऊन बसला होता.एक माणूस तर चक्क महिनाभराचं बाळ 'ठेवू की नको' हे विचारायला आला होता,कारण मागच्या वेळी मास्तरांनी मुलाचा योग सांगितला होता.दुसरीकडे,एक आई आपल्या अल्पवयीन मुलीच्या वागण्याने हताश होऊन रडत होती; मास्तरांनी तिच्या पत्रिकेतला 'मंगळ' कडक असल्याचे सांगून तिला अधिक सावध राहायला बजावलं.

ते दृश्य पाहून मला तो एखादा 'मल्टीस्पेशालिटी दवाखाना' वाटू लागला,जिथे शरीराचे नाही तर नशिबाचे उपचार चालतात.

माझा नंबर आला तेव्हा मी गप्पच होतो.मित्रांनीच माझी 'राजकीय व्याधी' मांडली आणि मास्तरांनी त्यावर काही उपाय सुचवले.तो उपाय काय होता,हे महत्त्वाचं नव्हतं;पण तिथून बाहेर पडताना माझं मन मात्र सुन्न झालं होतं.

गाडी पुन्हा परतीच्या प्रवासाला लागली.चाकं वेग घेत होती,पण विचारांचं चक्र त्यापेक्षाही वेगाने फिरत होतं. खरोखरच,आकाशातल्या ग्रहांच्या स्थितीवरून माणसाचं आयुष्य ठरत असेल का? की हा केवळ मानवी भीतीचा मोठा बाजार आहे? विज्ञान सांगतं की हे विश्व अजूनही प्रसरण पावतंय, विस्तारतंय; पण माणसाचं मन मात्र दिवसागणिक आकुंचन पावत चाललंय.माणसं एकमेकांशी बोलायची थांबली आहेत. नात्यांमधला संवाद हरवलाय आणि त्यातून येणारा अबोला माणसाला इतकं एकटं पाडतोय की, त्याला व्यक्त होण्यासाठी अशा ठिकाणांचा आधार घ्यावा लागतोय.

असं नाही की माझा या गोष्टींवर पूर्णपणे अविश्वास आहे—असा असता तर मी तिथे गेलोच नसतो.पण त्या गर्दीतल्या प्रत्येक चेहऱ्यावरची असहायता पाहून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली: आज माणूस भौतिकदृष्ट्या प्रगत होत असला, तरी मनान मात्र खूप 'कमकुवत' होत चालला आहे. आपण शोधतोय ते उत्तर कुंडलीत आहे की आपल्याच आत्मविश्वासात, हा प्रश्न त्या घाटावरच्या वाऱ्यासारखा माझ्या मनात घुमत राहिला. ...!

**लेखक- मंगेश सुभाष**
**सोहनी सोयगाव जिल्हा**
**- छत्रपती संभाजीनगर**
**मो.न.9673929673 |**

# धडधडणाऱ्या सायलेन्सरचा खेळ खल्लास

**तभा. वृत्तसेवा**

**बीड / प्रतिनिधी** |

बीड शहरात बुलेट मोटारसायकलच्या सायलेन्सरमधून होणार्या कर्णकर्कश आवाजाविरोधात पोलिसांनी आता जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आक्रमक पवित्रा घेतला आहे. रस्त्यावर धुमाकूळ घालत नागरिकांची झोप उडवणार्या आणि कायद्याची पायमल्ली करणार्या वाहनधारकांवर विशेष दंडात्मक मोहीम राबवत पोलिसांनी नियम मोडणार्यांचे सायलेन्सर जप्त करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे.

यावेळी नव्याने रुजु झालेले वाहतुक शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीपकुमार खेडकर यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार अजिनाथ मुंडे, पोलीस चालक संतोष हारके, पोलीस हवालदार राहुल गायकवाड, पोलीस अंमलदार मोहन बनसोडे, संतोष मोरे, शेषनारायण गाडे, पोलीस चालक अंमलदार नारायण वाघमारे उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आजपासून जिल्ह्यात हेल्मेट सक्ती

## अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी नियम पाळणे बंधनकारक




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

शासनाच्या निर्देशाप्रमाणे अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात हेल्मेट सक्ती व वाहतुकीचे नियम पाळण्याचे बंधनकारक होणार असल्याची माहीती पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी दिली.

हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या अध्यक्षतेखाली दि २० एप्रिल २०२६ रोजी कै. शिवाजीराव देशमुख सभागृहात महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे अपघाताचे प्रमाण कमी करून जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी वाहतूक नियम जनजागृती व हेल्मेट सक्ती तसेच प्रथमोपचार माहिती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी केले. हिंगोली जिल्ह्यात मागील दोन वर्षापासून अपघाताचे प्रमाण हे लक्षणीय वाढले असून मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी व वित्तहानी होत आहे, एकंदरीत अपघाताचा अभ्यास केल्यास ५० टक्के पेक्षा जास्त अपघातात मोटरसायकलस्वार मृत्यूमुखी पडतात. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यात २० एप्रिल २०२६ पासून मोटार सायकल चालवणारा व पाठीमागे बसणाऱ्या इसमास हेल्मेट सक्ती करण्यात आली आहे. तसेच चार चाकी वाहन चालकांनी सीट बेल्टचा वापर करावा, दारू पिऊन वाहन चालू नये, वाहन चालवताना मोबाईलचा वापर करू नये, ट्रिपल सीट मोटार सायकल चालू नये, वाहन चालवताना वाहतूक नियमांचे पालन करावे, वेळोवेळी चालकांनी मेडिकल चेकअप करून घ्यावे, वहाणाचे फिटनेस तपासावे अशा प्रकारच्या सुद्धा सूचना देण्यात आल्या. अपघात स्थळी नागरिकांनी जखमी लोकांना मदत करावी, तात्काळ ११२ व १०८ वर निशुल्क कॉल करून पोलीस व वैद्यकीय मदत बोलावून घ्यावी व हॉस्पिटलमध्ये दाखल करावे. अपघातात मदत करणाऱ्या लोकांची ओळख देणे बंधनकारक नाही तसेच त्यांना कोर्ट कचेरी सुद्धा करावी लागणार नाही . तसेच पीएम राहत योजनेअंतर्गत अपघातात जखमी इसमांना मान्यता प्राप्त रुग्णालयामध्ये दीड लाखापर्यंत मोफत उपचार असणार आहे अशा प्रकारचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

परिवहन अधिकाऱ्यांतर्फे सुद्धा वाहतूक नियमाबाबत जनजागृती करून विद्यार्थ्यांनी विनापरवाना वाहन चालू नये, पालकांनी सुद्धा आपल्या पाल्यांना वाहन देऊ नये अशा प्रकारचे निर्देश देण्यात आले. सदर प्रसंगी वैद्यकीय पथकाद्वारे प्रथमोपचार बाबत व सीपीआर बाबत प्रात्याक्षीक दाखवण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन , अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलीस अधिकारी कुंदनकुमार वाघमारे, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, पोलिस निरीक्षक संदीप मोदे, जिवीशाचे पोलिस निरीखक जमीर नाईक, शहर वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक शरद मरे, चंद्रकीर्ती टिपले, विक्रांत भोईने परिवहन अधिकारी यांचे सह डॉक्टर्स पथक, सर्व ठाणेदार तसेच प्रतिष्ठित नागरिक, खाजगी प्रवासी वाहतूक करणारे चालक, शाळेतील विद्यार्थी, पोलीस पाटील, पत्रकार यांचे सह मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सपोनि शिवसांब घेवारे यांनी केले.

# हळद उत्पादक शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## शासन दराप्रमाणे हळदीची खरेदी करा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

येथील संत नामदेव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळद उत्पादन शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात हळद विक्रीसाठी आणली आहे. शासन दर प्रतिक्विंटल १६ हजार ९०० रूपये असतांना व्यापाऱ्यांकडून हळद १२ हजार प्रमाणे खरेदी होत असल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडीत थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढीत जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले.

येथील संत नामदेव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मागील सात दिवसांपासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वाहनांद्वारे हळद विक्रीसाठी आणली आहे. हळद मोठ्या प्रमाणात आणल्यामुळे लिलाव जलदगतीने होत नाही. तसेच व्यापाऱ्यांनी खरेदी केलेली हळद मार्केट यार्डमध्येच थप्पी रचून ठेवल्यामुळे शेतकऱ्यांचा हळदीचा माल उतरवण्यासाठी जागा शिल्लक नाही. शेतकऱ्यांनी आणलेली वाहने दोन ते तीन दिवस ताटकळत उभी ठेवावी लागत आहेत. एका दिवसाचे भाडे १ हजार रूपये वाहन धारकांना द्यावे लागत आहे. त्यातच अवकाळी पावसाचा इशारा दिल्यामुळे उघड्यावर हळद ठेवल्यास शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होण्याची दाट शक्यता आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोमवारी हळदीचा लिलाव होत असतांना शेतकऱ्यांचा माल १२ हजार प्रतिक्विंटल प्रमाणे खरेदी होत असल्यामुळे शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली तसेच शेतकऱ्यांना कोणत्याही सुविधा मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडीत कृषी उत्पन्न बाजार समितीपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत घोषणाबाजी करीत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोर्चा काढला. अचानक शेतकऱ्यांनी मोर्चा काढल्यामुळे कार्यालय परिसरात एकच गोधळ उडाला होता. तत्काळ शेतकऱ्यांची हळद शासन दराप्रमाणे खरेदी करावी तसेच हळदीचे तत्काळ लिलाव करून शेतकऱ्यांना सुविधा द्याव्यात अशी मागणी या मोर्चेकऱ्यांनी केली आहे.

# घरगुती साहित्य संचासाठी कामगारांच्या लांबच लांब रांगा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणीकृत असलेल्या कामगारांना घरगुती उपयोगी वस्तूंच्या संचाचे (किट) वाटप सध्या हिंगोली शहराजवळील लिंबाळा एमआयडीसी भागात सुरू आहे. हे साहित्य मिळवण्यासाठी आज सकाळपासूनच जिल्हाभरातील हजारो कामगारांनी या ठिकाणी मोठी गर्दी केली असून, परिसरात कामगारांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत.

जिल्हाभरातून कामगारांची हजेरी: केवळ हिंगोली शहरच नव्हे, तर जिल्ह्यातील विविध तालुक्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगार पहाटेपासूनच लिंबाळा एमआयडीसी परिसरात दाखल झाले आहेत.

रांगांमध्ये महिला आणि वृद्ध कामगारांची संख्या मोठी आहे. मात्र, या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची किंवा सावलीची पुरेशी व्यवस्था नसल्याने उन्हाचा चटका सहन करत कामगारांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे. मंडळाकडून मिळणाऱ्या या संचामध्ये संसारासाठी उपयुक्त अशा विविध वस्तूंचा समावेश असल्याने, आपला नंबर लवकर लागावा यासाठी कामगारांमध्ये काही प्रमाणात चढाओढही दिसून येत आहे.

यावेळी काही कामगारांनी प्रतिक्रीया देतांना सांगितले की, आम्ही सकाळपासून रांगेत आहोत, पण गर्दी खूप असल्याने नंबर कधी येईल हे सांगता येत नाही. कामाचा दिवस बुडवून आम्ही येथे आलो आहोत, प्रशासनाने वाटपाची प्रक्रिया अधिक सुटसुटीत करायला हवी.



**हिंगोली– नगर परिषदेच्या लिंबाळा मक्ता येथील कचरा डेपोची आग अजूनही धुमसत असून यामुळे मोठा अनर्थ आणि नुकसान होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देऊन आग आटोक्यात आणावी अशी मागणी होत आहे. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### मेडीकल लाईनमध्ये वाहतुकीची कोंडी



हिंगोली– शहरातील जुन्या वस्तीतील मेडीकल लाईन जवळील चौकात वाहनांची नेहमीच कोंडी होत असतांना दिसत आहे. या भागात मेडीकल दुकाने, सदर बाजार, महावीर चौकातून येणारी वाहने, जुने ग्रामीण पोलिस ठाण्याकडून येणारी वाहने तसेच अत्यंत अरूंद रस्ता यामुळे या भागात नेहमीच वाहतुकीची कोंडी होत असतांना दिसत आहे. सदर बाजारातील किराणा दुकाने, मसाल्याची दुकाने, फुलमंडी तसेच हरण चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांची अस्ताव्यस्त पार्कींग, हातगाडे यामुळे या भागात वाहनांची कोंडी होत आहे. याकडे वाहतुक पोलिसांनी लक्ष देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

### वगरवाडी तांड्यात प्राणप्रतिष्ठा, कलशारोहन



हिंगोली– औंढा नागनाथ तालुक्यातील वगरवाडी तांडा येथील जगदंबा व सेवालाल महाराज मंदिरात श्री जगदंबा देवी व श्री सेवालाल महाराज, रामराव बापू यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना व जगदंबा व सेवालाल महाराज मंदिराचा कलशारोहण सोहळा, विविध कार्यक्रमाच्या आयोजनाने सोमवारी (ता.२०) एप्रिल रोजी उत्साहात झाला. वगरवाडी तांडा येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त होमहवन पुरोहित सुधीर महाराज शिरडशहापूरकर ,श्री रमेश महाराज पोहरादेवी (मूर्ती प्राणप्रतिष्ठाण यांच्या हस्ते), महंत आत्मानंद गिरीजी महाराज, सिद्धनाथ संस्थान गांगलवाडी महंत श्री ह भ प ज्ञानेश्वर माऊली अमरगड यांचे प्रवचन व ह भ प बापूराव महाराज खांबलवाडी ,बंजारा भजन), ह भ प माणिक महाराज कुंभी ( बंजारा भजन) झाले. तसेच, मंदिराचे कलशारोहण झाले. यावेळी तुकाराम राठोड, बाळू राठोड, गोविंद राठोड, दादाराव जाधव, सचिन राठोड, अजय राठोड, गंगाधर चव्हाण, वसंत राठोड, बापूराव जाधव, शेषराव राठोड, बालाजी राठोड, फकीरा राठोड, रामचंद्र चव्हाण, संजय चव्हाण आदींची उपस्थिती होती. फकीरा जीजा राठोड (नायक) व रामचंद्र सखाराम चव्हाण (कारभारी) या कार्यक्रमाचे संयोजक होते. यावेळी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# वन विभागाच्या पथकाने उमरा फाटा शिवारात सागवान केले जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

हिंगोली ते कळमनुरी मार्गावर उमरा फाटा शिवारात वन विभागाच्या पथकाने रविवारी सागवानाची वाहतूक करणारा टेम्पो जप्त केला आहे. याप्रकरणी पुढील कार्यवाही सुरू असून या कार्यवाहीमुळे वृक्षतोड करणाऱ्या तस्करांचे धाबे दणाणले आहे.

वन विभागाच्या वतीने जिल्ह्यात अवैध वृक्षतोड थांबविण्यासाठी पथके तयार करण्यात आली आहेत. विभागीय वन अधिकारी राजेंद्र नाळे, सहाय्यक विभागीय वन अधिकारी सचिन माने, वन परिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार, विश्वनाथ टाक, माधव केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली, कळमनुरी तसेच वसमत, औंढा नागनाथ, सेनगाव तालुक्यात पथकाकडून गस्त घातली जात आहे.

रविवारी दुपारी उमरा फाटा शिवारातून एका टेम्पोमध्ये सागवान लाकूड भरून वसमतकडे नेला जात असल्याची माहीती वन विभागाला मिळाली होती. त्यावरून वन परिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार, वनपाल काळे, वनरक्षक अशोक चव्हाण यांच्यासह पथकाने वाहनाची तपासणी केली असता त्यात अवेधरित्या सागवान लाकूड आणि वाहतुक करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पथकाने सागवान व टेम्पो जप्त केला आहे. पुढील कार्यवाही सुरू आहे.

# लग्नसराईमुळे बर्फाच्या दरात वाढ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

जिल्ह्यात सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून, घामाच्या धारांनी नागरिक हैराण झाले आहेत. वाढत्या उष्णतेसोबतच सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने बाजारपेठेत बर्फाची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.

हिंगोली शहरालगत असलेल्या एमआयडीसी परिसरातील बर्फ कारखान्यांवर सध्या बर्फ खरेदीसाठी व्यापाऱ्यांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

कडाक्याचे ऊन आणि लग्नकार्यांची रेलचेल यामुळे थंड पेये, ज्यूस सेंटर आणि लग्नातील पाहुण्यांच्या व्यवस्थेसाठी बर्फाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मागणी वाढल्याने बर्फाच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. सध्या बाजारपेठेत एका बर्फाच्या लादीची किंमत १,००० ते १,२०० रुपयांपर्यंत पोहोचली आहे. तरीही बर्फ मिळवण्यासाठी कारखान्याबाहेर सकाळपासूनच वाहनांच्या रांगा लागत आहेत. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून आलेले किरकोळ विक्रेते आणि केटरर्स व्यावसायिक एमआयडीसीमध्ये बर्फासाठी पहाटेपासूनच गर्दी करत आहेत.

उन्हामुळे बर्फाचे उत्पादन आणि मागणी यामध्ये तफावत निर्माण होत असल्याने काही ठिकाणी बर्फाचा तुटवडाही जाणवू लागला आहे. वाढत्या दरामुळे थंड पेयांच्या किंमतीवरही याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्या एमआयडीसी भागात बर्फ कारखान्याबाहेर बर्फाच्या लाद्या भरलेली वाहने आणि व्यापाऱ्यांची होणारी गडबड वाढत्या उन्हाची आणि बदलत्या बाजारपेठेची साक्ष देत आहे.

# मार्केट यार्डात व्यापाऱ्यांच्या मालाच्या थप्प्या, शेतकऱ्यांचा माल वाहनांत



**विजय गुंडेकर**
**हिंगोली, २० एप्रिल**

शहरातील संत नामदेव मार्केट यार्डमध्ये व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या मालाच्या थप्प्या अनेक दिवसांपासून पडून आहेत. त्यामुळे बाहेरगावाहून कृषी उत्पन्न बाजार समितीत वाहनांतून विक्रीसाठी आणलेला माल शेतकऱ्यांना यार्डात टाकण्यासाठी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे वाहनांचे दर दिवसाचे भाडे आणि शेतकऱ्यांचा जेवणाचा आणि निवासाचा खर्च त्यांना खिशातून द्यावा लागत आहे. याकडे बाजार समिती लक्ष देईल का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

विदर्भ आणि मराठवाड्याची मोठी बाजारपेठ असलेल्या हिंगोली येथील मोंढ्यामध्ये सध्या हळद विक्रीसाठी आलेल्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. मात्र, बाजारभावातील घसरण आणि नियोजनाच्या अभावामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

प्रतिक्षेचा कालावधी: मोंढ्यात हळद विक्रीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना ४ ते ६ दिवस ताटकळत राहावे लागत आहे. रविवारी देखील शेतकऱ्यांची मोठी गर्दी दिसून आली.

खर्चात वाढ: मुक्कामाचा वाढता कालावधी आणि वाहनांचे भाडे यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला साधारण ४,५०० रुपयांपर्यंत अतिरिक्त खर्च सोसावा लागत आहे. इतक्या दिवसांच्या प्रतिक्षेनंतरही हळदीला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

आम्ही तीन–तीन दिवसांपासून इथे थांबलो आहोत. घर सोडून सहा दिवस झाले, पण अजून नंबर आलेला नाही. खिशातले पैसे संपत आलेत आणि मालाला भावही नाही. अशाने शेतकऱ्याने जगायचे कसे? अशी उद्विग्न भावना एका शेतकऱ्याने व्यक्त केली. मोंढ्यातील मालाची उचल (बीट) करण्याची प्रक्रिया वेगवान करावी आणि शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा, अशी मागणी महागाव तालुक्यासह इतर भागांतून आलेल्या शेतकऱ्यांनी केली आहे. प्रशासनाने याकडे लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे.

# हिंगोली नगर परिषदेच्या कचरा डेपोची आग विझेना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

हिंगोली नगर परिषदेच्या लिंबाळा मक्ता येथील कचरा डेपोला २२ मार्च रोजी भीषण आग लागली होती. या आगीमुळे परिसरातील झाडे जळाली तसेच बरेच नुकसान झाले होते. अग्नीशमन दलाने ही आग त्यावेळी विझवली असल्याचे सांगण्यात आले परंतु प्रत्यक्षात अजूनही कचरा डेपोची आग धुमसत असून मोठा अनर्थ होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी नुकतीच कळमनुरी येथील कचरा डेपोला भेट दिली होती. त्यानंतर पत्रकारपरिषदेत त्यांनी हिंगोली नगर परिषदेच्या कचरा डेपोलाही भेट देणार असल्याचे सांगितले होते.

हिंगोली नगर परिषदेचा लिंबाळा मक्ता भागात कचरा डेपो आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा गोळा केल्या जातो परंतु २२ मार्च रोजी या डेपोला भीषण आग लागली. ही आग विझवण्यासाठी हिंगोली, कळमनुरी, सेनगाव याठिकाणाहून अग्नीशमन दलांना पाचारण करण्यात आले होते. शेकडो बंबाद्वारे ही आग विझवण्याचा प्रयत्न अग्नीशमन दलाने केला होता. परंतु अजूनही कचरा डेपोची आग धुमसत असल्याचे दिसत आहे. ही आग वाढत असून याकडे वेळीच लक्ष दिले नाहीतर पुन्हा एकदा मोठे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकारी यांनी तत्काळ कचरा डेपोची आग विझवण्यासाठी संबंधित यंत्रणांना आदेशित करावे अशी मागणी होत आहे.

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उष्म्यामुळे दुपारच्या सुमारास प्रवाशांची संख्या रोडावली

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. २० एप्रिल :** सध्या उष्म्याने प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याने दुपारच्या सुमारास एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या रोडवल्याचे निदर्शनास येत आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने प्रवाशांची संख्या वाढली आहे. अनेक शाळांच्यापरीक्षा संपल्याने सुट्यांसाठीमंडळी गावाकडे जात आहेत. मात्र सध्यस्थितीतवाढत्या उष्म्यामुळे दुपारच्या वेळेला प्रवास करण्याऐवजी बहुसंख्य प्रवसी सकाळच्या सत्रात प्रवास करण्यास प्राधान्य देताना दिसत आहेत. त्यामुळे दुपारच्या तुलनेत सकाळच्या वेळेतीलबसेसना प्रवाशांची तोबा गर्दी होत असल्याचे पाहायला मिळत आहे. दुपारी उन्हाच्या तीव्रतेपासूनबचाव करण्याच्या उद्देशाने प्रवासी प्रवास करणे टाळत असल्याचे लक्षात येते. दुपारच्या वेळेत बस स्थानक परिसरात फेरफटका मारला असता, बसेसना गर्दी कमी आणि उपलब्धअसलेल्या बसमधून प्रवास करणाऱ्यांची संख्या खूपचकमी पाहायला मिळाली. उन्हाच्या तडाख्यापासून सुटका करून घेण्याच्या दृष्टीने पुढचे काही दिवस अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



## विविध वृत्त...

### लातूर उपशिक्षणाधिकारी पदी सुशील फुलारी



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २० एप्रिल :** लातूर जिल्हा परिषदेच्या उपशिक्षणाधिकारी प्राथमिक त्या रिक्त पदी तालुका रेणापूर जिल्हा लातूर येथील रहिवाशी असलेले सुशील अरविंदराव फुलारी यांची नियुक्ती.

लातूर जिल्ह्याला लातूर जिल्ह्यातील एक भूमिपुत्र उपशिक्षणाधिकारी म्हणून लाभला आहे.

सुशिल फुलारी हे धाराशिव जिल्हा परिषद अंतर्गत कळंब पंचायत समिती येथील येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत होते. फुलारी हे अतिशय उपक्रमशील व गुणवत्तेला प्रोत्साहन देणारे म्हणून धाराशिव जिल्ह्यात त्यांची ख्याती आहे.त्यांच्या अनेक उपक्रमापैकी राज्यस्तरावर गेलेले उपक्रम गुढीपाडवा प्रवेश वाढवा, परीक्षा एक मार्गदर्शक अनेक तसेच मिशन शिष्यवृत्ती नवोदय कार्यशाळा तसेच एन.एम.एम.एस. सैनिकी विद्यालय यासारख्या स्पर्धा परीक्षेमध्ये मोठ्या प्रमाणात ईटकुर बीट मध्ये गुणवत्ता वाढ करून ईटकुर बीट गुणवत्तेत अग्रेसर ठेवलेले आहे त्यांच्या नियुक्ती मुळे लातुर जिल्ह्यातील येथेच शिक्षण झालेले त्यांचे सर्व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे

### कर्मचाऱ्यांचा आज पासून संपावर जाण्याचा इशारा

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २० एप्रिल :** शिक्षक सेनेने आज दि.२१ एप्रिल २०२६ पासून राज्यातील सुमारे साडेसतरा लाख शासकीय व निमशासकीय कर्मचारी आपल्या न्याय हक्कासाठी बेमुदत संपावर जातील, असा इशारा दिला आहे. या ऐतिहासिक लढ्याला महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे अध्यक्ष आ. ज. मो. अभ्यंकर यांनी सक्रिय पाठिंबा दिला आहे. राज्यातील सर्व शिक्षक सेना सदस्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या संपात पूर्ण ताकदीने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रमुख मागण्यांमध्ये जुनी पेन्शन योजना कोणत्याही अटीशिवाय जशीच्या तशी लागू करावी. आश्र्वासित प्रगती योजना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे लाभ लागू करावेत. सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे. मागण्या मान्य होईपर्यंत माघार घ्यायची नाही. सर्व पदाधिकाऱ्यांनी, सदस्यांनी या संपात सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षक सेनेने केले आहे.

### माजी महापौर सुरेश पवार यांचे निधन



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २० एप्रिल : लातूर महापालिकेचे माजी महापौर सुरेश निवृत्तीराव पवार यांचे रविवारी (दि.१९) सकाळी साडे आठ वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने पुण्यातील मुलीच्या घरी निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर येथील मारवाडी स्मशानभूमीत रविवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्र्चात एक मुलगा, दोन विवाहित मुली, सहा भाऊ असा मोठा परिवार आहे.**

**महापौर सुरेश पवार हे सलग सहावेळा लातूर नगरपरिषद व महापालिकेचे नगरसेवक होते. दरम्यानच्या काळात त्यांनी विविध विषय समित्यांची सभापतीपदे भूषविली, त्याचप्रमाणे पहिल्या लातूर महापालिकेचे काँग्रेस पक्षाकडून उपमहापौर होते.**

**त्यानंतर भाजपमध्ये जाऊन ते महापौर झाले होते.**

**मागील दोन दिवसांपूर्वी सुरेश पवार हे पुण्याला मुलीकडे गेले होते. शनिवारी रात्री मुलगी, जावई व सुरेश पवार हे रात्री साडेबारा वाजेपर्यंत गप्पा मारत बसले होते. दररोज पहाटे पाच वाजताच ते झोपेतून उठतात. परंतु, रविवारी सकाळी सात वाजेपर्यंत ते उठलेच नाहीत, म्हणून त्यांची मुलगी उठविण्यास गेली असता त्यांच्याकडून काहीच प्रतिसाद आला नाही. यामुळे त्यांना तत्काळ रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सुरेश पवार यांचे पार्थिव पुण्यातून लातूरला आणण्यात आले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी मारवाडी स्मशानभूमीत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील विविध मान्यवरांची उपस्थिती होती.**

# आ. अमित देशमुखांची अनुपस्थिती लातूरकरांना खटकली !



तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. २० एप्रिल :** तमाम लातूरकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्र्न बनलेल्या लातूरच्या जिल्हा रुग्णालयाचा भूमिपूजन सोहळा शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. या सोहळ्यास लातूर शहर विधानसभा मतदार संघाचे सलग चौथ्यांदा प्रतिनिधित्व करणारे आ. अमित देशमुख आवर्जून उपस्थित राहतील असा लातूरकरांचा कयास होता. कारण अमित देशमुखांनी लातूरच्या पालकमंत्रीपदासोबतच राज्याच्या वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री म्हणूनही जबाबदारी सांभाळली होती. त्यांना या विषयाचा चांगला अभ्यासही आहे. मात्र, या सोहळ्यासत्यांची अनुपस्थिती लातूरकरांना चांगलीच खटकल्याचे दिसून आले. सामान्यांच्या आरोग्याशी जणू आपले काहीही देणेघेणे नाही असेच त्यांच्या या कृतीवरून निदर्शनास येत असल्याच्या प्रतिक्रियाही ऐकायला मिळाल्या.

आ. अमित देशमुख, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा भविष्यातील महाराष्ट्राचा प्रमुख चेहरा असणारे नेतृत्व. आजही त्यांच्या सक्षम नेतृत्वात लातूर जिल्ह्यावर काँग्रेसची बऱ्यापैकी पकड असल्याचे दिसून येते. नुकत्याच पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या तसेच लातूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत त्यांच्याच नेतृत्वात काँग्रेसने दमदार कामगिरी केली. लातूर मनपावर निर्विवाद बहुमत मिळवण्याबरोबरच लातूर जिल्हा परिषदेतही सर्वाधिक जागा मिळवणारा क्रमांक एकचा राजकीय पक्ष म्हणून त्यांनी काँग्रेसला आघाडी मिळवून दिली. या दोन्ही प्रमुख स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आ.देशमुखांनी भाजपवर मात करण्यात यश संपादन केले, ही बाब मान्यच करावी लागेल. मात्र, आ. अमित देशमुखांचे हे यश निश्र्चितच ' निर्भेळ ' नव्हते, ही बाब कोणीही खाजगीत मान्य करेल, याबद्दल कोणतीही शंका उपस्थित करण्याचे कारण नाही.

लातूरच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित राहिलेला जिल्हा रुग्णालयाचा प्रश्र्न सोडविणे मुळात आ. अमित देशमुख यांच्यासाठी फारसे अडचणीचे नव्हते. त्यांनी मनात आणले असते तर हा प्रश्र्न तेव्हाच सुटू शकला असता, असे आजही लातुरातील असंख्य मंडळींचे म्हणणे आहे. मात्र, प्रत्यक्षात हा विषय अनेक वर्षे ताटकळत राहिला. लातूरच्या सामान्य नागरिकांचा आजही देशमुख परिवारावर विश्र्वास आहे. या विश्र्वासाला पात्र राहून राजकारण आणि समाजकारण केले तर देशमुख परिवाराची लातूरवरील पकड पुढील काळातही कायम राहू शकणार आहे. आ. अमित देशमुख यांचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही पक्षाच्या पलीकडचे घनिष्ठ संबंध आहेत. विरोधी पक्षाचे आमदार म्हणूनही त्यांनी या प्रकरणाबाबत देवेंद्र फडणवीसांकडे शब्द टाकला असता तर त्यांनी अमित देशमुखांचा शब्द कदापि खाली पडू दिला नसता. तरीही आ. अमित देशमुख यांनी तसे न केल्याबद्दल तमाम लातूरकरात नाराजीचा सूर आहे. अमित देशमुखांनी जिल्हा रुग्णालयासाठी वजन खर्ची घालणे टाळले असले तरी किमान रुग्णालयाच्या भूमिपूजन सोहळ्यास तरी ते लातूर शहराचे आमदार या नात्याने उपस्थित राहतील, लातूरकरांच्या सोयीसाठी हे अद्यावत रुग्णालय लवकरात लवकर उभारले जावे,अशी अपेक्षा व्यक्त करतील,अशी सामान्य लातूरकरांनी अपेक्षा होती. परंतु आ. अमित देशमुख या सोहळ्यास अनुपस्थित राहिले. त्यांच्या अनुपस्थितीचे कारण काय आहे ? हे कळू शकले नाही. मात्र, लातूरकरांच्या जिव्हाळ्याचा विषय असतानाही शहराचे आमदार या रूपाने तरी त्यांनी उपस्थित राहायला हवे होते,अशा प्रतिक्रिया नागरीकातून व्यक्त होताना दिसत आहेत.

## जनगणनेवेळी धर्माच्या रकान्यात लिंगायत लिहा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २० एप्रिल : जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर यांनी १२व्या शतकात मानवतावादी अनुभव मंटपाच्या माध्यमातून लिंगायत धर्म संस्कार दिले. त्यामुळे लिंगायतांनी जनगणनेमध्ये आपली नोंद करताना धर्माच्या रकान्यात 'लिंगायत' म्हणून धर्माची नोंद करावी, असे आवाहन 'लिंगायत शरण फांऊडेशन'चे संस्थापक अध्यक्ष माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले. यासंदर्भात कर्नाटक राज्यात प्रबोधनात्मक चळवळ सुरू झाली आहे. तशी चळवळ आम्ही महाराष्ट्रात हाती घेतली आहे, असेही ते म्हणाले. महात्मा बसवेश्र्वर जयंतीचे औचित्य साधून 'लिंगायत शरण फांऊडेशन'च्या वतीने आयोजित सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले चंद्रकांत बिराजदार (सामाजिक), डॉ. गजानन हलकंचे (वैद्यकीय), (वैद्यकीय), शिरीष उटगे (उद्योग), सुशांत सांगवे (पत्रकारिता), डॉ. आशिष चलवदे (वैद्यकीय), गुरुनाथ उच्चेकर (उद्योग), बसवराज पैके (सामाजिक), विजय आव्हाळे (सामाजिक), सुरज गौंड (सामाजिक) यांना 'समाजरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

## रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या उच्चतम व्यावसायिक पुरस्काराचे वितरण



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २० एप्रिल :** रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या उच्चतम व्यावसायिक पुरस्काराचे वितरण नुकतेच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

लातूर शहरात सामाजिक कार्यामध्ये रोटरी अग्रगण्य आहे त्याचाच एक भाग म्हणून समाजातील उच्चतम व्यावसायिक मूल्य जतन करून व्यवसाय करणारे व्यावसायिक यांना हा पुरस्कार दिला जातो. रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर व्हिजिट पब्लिक फंक्शन हॉटेल भारत फाईन डाईन या ठिकाणी संपन्न झाले. ज्यामध्ये लातूर शहरातील प्रख्यात डॉ. शिरीष मस्के पाटील वैद्यकीय व्यवसाय त्याचबरोबर डॉ. धीरज मानकरी जीवन किसान ॲग्रो, सचिन बांगड ॲडमिशन मेड इझी, शैलेंद्र बलदोटा गुरु गणेश डमिडीया अँड प्रिंटर्स, फिरोज पठाण एस. एम. आर. कॅन्टीन त्याचबरोबर रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ द्वारा दिला जाणारा सेवा विशेष पुरस्कार सौ. ज्योती धोंडीराम शिंदे, महिला आरोग्य चळवळीतील प्रमुख तसेच संजय शंकरराव मंडाळे यांना दिव्यांग व्यक्तीचे उल्लेखनीय कार्य यासाठी प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल सुधीर लातूरे, सौ. संगीता सुधीर लातूरे, सहाय्यक प्रांतपाल एड. श्रीराम देशपांडे व सौ प्रतिभा श्रीराम देशपांडे, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी डॉ. राजगोपाल तापडिया, रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे , सौ. ऋतुजा बाळासाहेब खैरे, सचिव डॉ.नेताजी शिंगटे, सौ.शितल नेताजी शिंगटे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख सुदर्शन कांबळे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत रामढवे व रवींद्र चामले यांनी केले. कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे माजी अध्यक्ष, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स तथा सर्व सदस्य सहपरिवार उपस्थित होते.

# व्हीएस पँथर्सतर्फे ४१ जणांचे रक्तदान



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २० एप्रिल :** व्हीएस पँथर्स विद्यार्थी आघाडीच्या वतीने महात्मा बसवेश्र्वर यांच्या जयंतीनिमित्त रविवारी आयोजित शिबिरात ४१ रक्तदात्यांनी रक्तदान करून महात्मा बसवेश्र्वरांना अभिवादन केले.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सहाट अशोक, महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ बावासादेव संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या हस्ते महात्मा बसवेश्र्वर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करुन करण्यात आले. यावेळी संघटनेचे मार्गदर्शक रवी कुरील, कामगार आघाडी शहराध्यक्ष गौस शेख, जिल्हा संघटक सुरज सूर्यवंशी, सचिन गायकवाड, संदीप बानाटे, विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे, शहराध्यक्ष अविष्कार कांबळे व जिल्हा उपाध्यक्ष महादेव कांबळे उपस्थित होते. संजीवनी ब्लड बँकेचे जनसंपर्क अधिकारी डॉ. सितम सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील टीमने रक्त संकलन केले. शिबिराच्या यशस्वितेसाठी सुरज कांबळे,ष सुजीत कांबळे, रोहित दंडे, रितेश जांभळे, समिर शेख, चेतन कंधारे, समाधान शिंदे, उत्कर्ष सुर्यवंशी, सुजीत मस्के, सोनु कांबळे, अनिकेत पाटील, विरनाथ गायकवाड, प्रवीण बिरादार, ओम पाटील, सुदर्शन ओव्हळ, विशाल गायकवाड आदींसह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कल्याण वाघमारे यांना रंगकर्मींची श्रध्दांजली



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २० एप्रिल :** लातूरच्या नाट्यविश्वाला धक्का देणारे नाट्यवेडे रंगकर्मी कल्याण वाघमारे यांच्या स्मरणार्थ शनिवारी (दि. १८) सकाळी ११ वाजता येथील पंचवटी हॉटेलमध्ये रंगकर्मींच्यावतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शहरातील नाट्यप्रेमी, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांच्या भावना दाटून आल्या होत्या.

प्रा. सुषमा अंधारे म्हणाल्या, महाविद्यालयीन काळातच कल्याण वाघमारे यांनी सांस्कृतिक क्षेत्रात उच्च शिखर गाठले होते, मात्र त्यांचे पाय कायम जमिनीवरच होते. अशा गुणी कलावंताच्या कुटुंबीयांसाठी कायमस्वरूपी निधी उभारण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी कल्याण वाघमारे यांच्या तिन्ही मुलींच्या नावे प्रत्येकी २१ हजार रुपयांची मुदत ठेव करण्याचे जाहीर केले. रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांनी कल्याण वाघमारे यांच्या एका मुलीच्या पाच वर्षांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. 'नाट्य स्पंदन'च्या वतीने डॉ. अशोक आरदवाड यांनी एका मुलीचे पालकत्व स्वीकारले. प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी तिन्ही मुलींच्या लग्नाचा खर्च व ५१ हजार रुपये देण्याची घोषणा केली. यावेळी विविध सामाजिक संस्था आणि मान्यवरांनी 'कल्याण निधी' उभारण्याचा संकल्प केला. पत्रकार रामेश्र्वर बद्दर यांनी कुटुंबीयांना ५१ हजार रुपयांची मदत जाहीर केली. विनोदी अभिनेता बालाजी सूळ यांनी ११ हजार रुपयांची मदत जाहीर केली. यावेळी नाट्यकर्मी धनंजय बेंबडे, अविष्कार गोजमगुंडे, संजय अयाचित, सुरेखा मदने, प्रा. सुधीर देशमुख, अनिल कांबळे, पांडुरंग वाघमारे, अजय पांडे, भास्कर माने, पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर, संजय जमदाडे, प्रा. सुधीर अनवले, मोहन माने, अरुणा वाघमारे, अरुण बारस्कर, सुधन्वा पत्की, शाहीर संतोष साळुंके, डॉ. अनघा राजपूत, अनिल पुरी, महेश पवार, प्रशांत जानराव, यांसह अनेकांची उपस्थिती होती.

## मुख्याध्यापक, केंद्रप्रमुखांची वेतन निश्चिती होणार

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २० एप्रिल :** जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळांतल्या पदवीधर प्राथमिक शिक्षकांना प्राथमिक पदवीधर मुख्याध्यापक अथवा केंद्रप्रमुखपदी पदोन्नती दिल्यानंतर वेतन निश्र्चिती करताना एक वेतनवाढ देण्याबाबतचे आदेश दिले आहेत. प्रशिक्षित प्राथमिक पदवीधर शिक्षक पदोन्नतीपूर्वीच वेतनश्रेणीत किंवा वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन आहरण करीत असेल तरीही पदवीधर प्राथमिक मुख्याध्यापक अथवा केंद्रप्रमुख पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये निश्र्चितपणे वाढ होत असल्याने त्यांची एक वेतनवाढ देऊन वेतननिश्र्चिती करण्यात यावी.

## प्रा. रवी बापटले जिव्हाळा सेवारत्न पुरस्काराने सन्मानित

**उदगीर दि.२० एप्रिल :** समाजातील उपेक्षित, एड्सग्रस्त व निराधार घटकांसाठी आयुष्य वेचणारे समाजसेवक प्रा. रवि बापटले यांना उदगीरच्या जिव्हाळा ग्रुपतर्फे ' जिव्हाळा सेवारत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिव्हाळा ग्रुपतर्फे धोंडीहिप्परगा येथील हिराकाशी सेवालय वृद्धाश्रमात आयोजित भावनिक व प्रेरणादायी सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी माफसूचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने होते. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक विश्र्वनाथ मुडपे, जिव्हाळा ग्रुपचे अध्यक्ष विश्र्वनाथराव माळेवाडीकर व देविदासराव नादरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. भिकाने यांनी प्रा. बापटले यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हणाले, प्रा. बापटले यांनी समाजसेवेचा केवळ ध्यास घेतला नाही, तर आपले संपूर्ण जीवनच त्यासाठी अर्पण केले आहे. हासेगाव येथे त्यांनी उभारलेले सेवालय आणि 'हॅपी इंडियन व्हिलेज' याद्वारे एड्सग्रस्त मुलांचे संगोपन, शिक्षण, विवाह व पुनर्वसन करून त्यांनी त्यांना सन्मानाने जगण्याची नवी दिशा दिल्याचे त्यांनी नमूद केले. बापटले यांनी सुरू केलेल्या धोंडीहिप्परगा येथील हिराकाशी सेवालयात निराधार वृद्ध, महिला व अपंगांना केवळ आसरा नव्हे, तर सन्मानाने जगण्याची संधी दिली जाते. सर्व जाती-धर्मातील लोकांना समानतेने आश्रय देणारे हे सेवालय सामाजिक समता, बंधुता आणि मानवतेचे जिवंत प्रतीक असल्याचे विश्र्वनाथ मुडपे यांनी सांगितले.

### जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा व परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचित करण्यात येतो कि, माझे पक्षकार नामे. हसन तय्यब सय्यद, रा. बार्शी रोड, १२ नंबर पाटी मस्जीद जवळ, श्याम नगर, लातूर. यांनी मला दिलेल्या माहिती व कागद पत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस माहितीस्तव खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांनी मोजे. लातूर महानगर पालिका हद्दीतील खाडगाव विभागातील खुला प्लॉट नामे. सय्यद बद्रोहीन अजिजमियाँ, रा. बाभळगाव, ता. जि. लातूर. यांच्याकडून ठरावपत्र करुन घेतलेला असून, ज्याचा खरेदीखत दस्त डेबुक नं.५४१८/२००६, दि.११/१२/२००६ ईसवी अन्वये असून, मौजे. हरंगुळ (बु), ता. जि. लातूर येथील जमीन गट नं. ३१३ पैकीचा एन. ए. नं. एनएए/एलटीआर/ए/१८३६, दि. ३०/०८/१९९९ ईसवी अन्वये मे. अप्पर तहसीलदार, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट नं. १०६ चा पश्र्चिम भाग व प्लॉट नं. १०७ पूर्ण विक्री करत असून याचे विक्री क्षेत्र लांबी पूर्व पश्मि ४९ फुट व रुंदी दक्षिण उत्तर ४० फुट याचे एकूण क्षेत्रफळ १९६० चौ. फुट होत असून सदर प्लॉट ची चर्तुः सिमा खालील प्रमाणे आहे.

पूर्वेस प्लॉट नं. १०६ चा उर्वरित भाग, दक्षिणेस प्लॉट नं. १०० व १०१, पश्चिमेस-२० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस २० फुट रुंदीचा रस्ता येणे प्रमाणे वरील चर्तुःसिमेच्या आतील खुला प्लॉट विद्यमान मूळ मालक नामे. सय्यद बद्रोहीन अजिजमियाँ, रा. बाभळगाव. ता. जि. लातूर. यांनी माझ्या पक्षकारा सोबत विक्री ठराव केला आहे. तसेच ठरावा पोटी ईसारा रक्कम दिलेली आहे. तसेच सदरील मिळकती निर्वेध व निजोखिम असल्याची हमी विद्यमान मालकाने माझ्या पक्षकारास दिलेली आहे. तरी सदर खुला प्लॉट बदल जर कोणाचा उजर, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, लीन शेजाऱ्यांचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्ज असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध वाजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, लीन, झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत माझ्या खालील पत्त्यावर लेखी आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर आक्षेप नाही तर सदरील मिळकत ही निर्विवाद व निजोंखीम समजून माझे पक्षकार आपल्या हक्कात नोंदणीकृत खरेदीखत करुन घेतील मुदती नंतर आलेले कसल्याही प्रकारचे उजर आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकराक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन, दि.२०/०४/२०२६

तर्फे

ॲड. अशोक ज्ञानोबा लोखंडे

नोटरी भारत सरकार ऑफीस तहसील कार्यालया शेजारी, लातर.

मो. नं. :- ९४२१९८६४९५/९२८४९३९१३२

जाहीर प्रगटन देणार : हसन तय्यब सय्यदरा. श्याम नगर, १२ नं. पाटी, लातूर. मो. नं. ९६२३८०८०६४

# स्वच्छ भारत मिशनचा मुखवटा फाटला!
# लाखोंच्या कचराकुंड्या धुळीत

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २० एप्रिल -**

घोषणांचा गजर निधीचा पाऊस आणि प्रत्यक्षात गाव कचऱ्यात गुदमरलेले! स्वच्छतेच्या नावाखाली लाखो रुपये खर्च, पण जमिनीवर शून्य कामइस्लापूरमध्ये उघड झालेलं हे चित्र अक्षरशः हादरवून टाकणारं आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत आणि १५ व्या वित्त आयोगाच्या बांधित निधीतून खरेदी करण्यात आलेल्या कचराकुंड्या महिनोन्महिने गोदामात धूळ खात पडून आहेत. गावात मात्र कचऱ्याचे ढीग, दुर्गंधी आणि डासांचा उपद्रवहीच खरी 'स्वच्छता'! अशी चर्चा सुरु आहे.



**उघड झालेले धक्कादायक वास्तव**

लाखो रुपयांचा निधी खर्च पण सुविधा शून्य, कचराकुंड्या खरेदी वापर शून्य, कागदोपत्री स्वच्छता प्रत्यक्षात घाणच घाण, नियोजनाचा पूर्ण अभाव जबाबदारी कुणाचीच नाही, गावातील रस्ते, चौक, बाजारपेठ, बसस्थानकजिकडे पाहावं तिकडे कचऱ्याचे ढीग. नागरिक दुर्गंधीने त्रस्त, आरोग्य धोक्यात पण स्वच्छतेसाठी घेतलेली साधने मात्र कुलूपबंद आहे.

**कचराकुंड्या गोदामात आणि कचरा रस्त्यावरहा नेमका कसला विकास?**

हा सवाल आता प्रत्येकाच्या तोंडी आहे. काम झाल्याचे दाखवण्यासाठीच खरेदी झाली का?हा प्रश्न आता केवळ शंका नाही, तर थेट आरोपाच्या पातळीवर पोहोचला आहे. पारदर्शकतेचा अभाव आणि बेफिकीर कारभारामुळे इस्लापूरमध्ये स्वच्छ भारत मिशनचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे स्पष्ट दिसत आहे.

**जमिनीवरील वास्तव डोळे उघडणारे!**

मुख्य रस्ते व चौक कचऱ्याने व्यापलेले, बसस्थानक परिसरात अस्वच्छतेचा कळसप्रवासी त्रस्त नाल्या तुंबलेल्या, सांडपाण्याची दुर्गंधी कचराकुंड्या मात्र गोदामात कुलूपबंद आहेत.

**ग्रामस्थांचा संताप टोकाला**

निधीचा हिशोब द्याप्रत्येक रुपया कुठे गेला? असा सवाल करत कचराकुंड्या तात्काळ बसवानाहीतर रस्त्यावर उतरू असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

**प्रकरण चौकशीच्या उंबरठ्यावर?**

निधीचा वापर, खरेदी प्रक्रिया आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीया तिन्ही बाबींवर सखोल चौकशीची मागणी जोर धरत आहे. प्रशासनाने तातडीने कारवाई केली नाही, तर हा मुद्दा मोठ्या आंदोलनात परिवर्तित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सुरळीत वीज पुरवठ्यासाठी महावितरणकडून झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम सुरू

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २० एप्रिल -**

उदगीरहून ३३ के.व्ही मुक्रमाबादला विद्युत पुरवठा करणाऱ्या मेन लाईनला झाडाच्या फांद्यामुळे अडथळा निर्माण होऊ नये व विद्युत पुरवठा सुरळीत सुरू राहावा म्हणून मान्सून पूर्व मुक्रमाबाद येथील महावितरणचे कर्मचारी भर उन्हात अंदाजे २७ किलोमीटर मधील कट्टर च्या मदतीने फांद्या तोडण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

मुक्रमाबाद येथील ३३ के व्ही. ला गेल्या अनेक वर्षापासून अंदाजे ३३ किलोमीटर उदगीर येथून मुख्य लाईनद्वारे विद्युत पुरवठा नियमित सुरू असून यात मुक्रमाबाद ३३ किव्ही अंतर्गत चार फिटर च्या माध्यमातून अंदाजे चाळीस गावे असून यात वाडी तांडे यांचा समावेश असून या गावांना नियमित विद्युत पुरवठा सुरळीत आहे.पण ही मुख्य लाईन खूप जिर्ण झाल्यामुळे या लाईन वरील तारा,ब्रॅकेट,विद्युत रोधक,जीर्ण झाल्यामुळे एखादा वादळी वारा झाल्यास विद्युत पुरवठा तासनतास खंडित होतो याचा नाहक त्रास नागरिकांना सोसावा लागत आहे यामुळे या मुख्य लाईनच्या दुरुस्तीचे काम करण्याची मागणी दरवर्षी होत असते

विषेश म्हणजे याभागातील विजबिल



वसुली बऱ्यापैकी असून देखील तांत्रिक अडचणीचा मोठा अभाव आहे.३३ किलोमीटर उदगीर होऊन विद्युत पुरवठा करणाऱ्या मुख्य लाईन खालील झाडांचे फांद्या घुसून अडथळा निर्माण करत असल्याने बऱ्याचदा विद्युत पुरवठा खंडित होत आहे.उन्हाची तिव्रता लक्षात घेता सहाय्यक अभियंता राजु भुजबळे यांनी मान्सून पूर्व ही कामे पूर्ण होण्याच्या अनुषंगाने गेल्या काही दिवसापासून महावितरण कर्मचाऱ्यांच्या मदतीने अंदाजे २७ किलोमीटर विद्युत पुरवठा करणाऱ्या मुख्य लाईन खालील झाडांच्या फांद्या कट्टर च्या मदतीने कापण्याच्या कामावर जोर दिल्याने पावसाळ्यात विद्युत पुरवठा सुरळीत राहणार असल्याची माहिती भुजबळे यांनी दिली.

तसेच हाळणी ते दापका ३३ के. व्ही.ला सहा किलोमीटर अंतरा वरून विद्युत पुरवठा करणाऱ्या मेन लाईन खालील झाडाचे फांद्या तोडण्याचे काम सध्या मुक्रमाबाद महावितरण कर्मचाऱ्या कडून उन्हाचा पारा तीव्र असतानाही युद्ध पातळीवर काम सुरू आहे.हे काम यशस्वी करण्यासाठी मुक्रमाबाद महावितरण कंपनीचे कर्मचारी सुहास वाघमारे,प्रकाश गनिमे,व्यंकटराव मिरगुडे, उध्दव काळे,ज्ञानेश्वर माकणीकर,दत्तात्रेय अस्वले, अशोक इडलवार,उमेश वडमीलवार,अंबादास इंगळे,विनायक फुलारी, नामदेव गंदलवाडसह ठेकेदार सादीक यांच्या मदतीने हे काम मान्सून पुर्व पुर्णत्वाकडे जात आहे.

## मुदखेड शहरात महात्मा बसवेश्वर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**मुदखेड** -मुदखेड शहरात क्रांतिसूर्य, जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती दि. १९ एप्रिल रोजी मोंढा रोडवरील महात्मा बसवेश्वर चौक येथे अत्यंत उत्साही आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. श्री अपरंपार मठातील ईश्वर महाराज यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून आभिवादन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक आरती करण्यात आली. 'महात्मा बसवेश्वर महाराज की जय' या जयघोषाने संपूर्ण मोंढा रोड परिसर दुमदुमून गेला होता. परंपरेनुसार उत्सवाचे आयोजन दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील सचिन चंद्रे यांच्या पुढाकारातून या जयंती उत्सवाचे नियोजन करण्यात आले होते. सामाजिक एकोपा आणि बसवेश्वरांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने हा सोहळा दरवर्षी भव्य स्वरूपात साजरा केला जातो.या मंगलप्रसंगी शहरातील विविध स्तरातील मान्यवर आणि समाज बांधव उपस्थित होते. यावेळी नगरसेवक तथा पाणी पुरवठा सभापती श्याम आण्णा चंद्रे,कैलास गोडसे, संजय आऊलवार, गोविंद गोपनपल्ले, नारायण नर्डेले, पिंटू ठाकूर, दिनेश शेटे, प्रभाकर पांचाळ, प्रवीण काचावार,सुरेश शेटे,चांदु बोकेफोड,सचिन चंद्रे,आकाश बोकेफोड, मुकेश चंद्रे,बालाजी नव्हाते, फुले मिस्त्री, पिंटू शेटे, योगेश शेटे, अनिल अंबरखाने, गंगाधर कदम,विलास चंद्रे, चेतन कुलुपवार, मन्मथ राजेवार, अमर घोंगडे, संतोष काहाळेकर, प्रशांत चंद्रे आणि प्रशांत शेटे तसेच परिसरातील सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेतून वारसदारास २ लाखांची मदत

**किनवट** -केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत एका कुटुंबाला आर्थिक आधार मिळाल्याची घटना समोर आली आहे. मौजे सिंदगी दहेगाव येथील वंदा नागोराव चव्हाण यांनी दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना घेतली होती. त्यांनी वार्षिक ४३६ प्रीमियम भरून विमा संरक्षण घेतले होते. दरम्यान, कामानिमित्त त्या छत्रपती संभाजीनगर येथे गेल्या होत्या. दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७:१० वाजण्याच्या सुमारास साजापूर (छत्रपती संभाजीनगर) येथे रस्ता ओलांडताना झालेल्या अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर संबंधित विमा योजनेअंतर्गत त्यांचे पती नागोराव चव्हाण यांना छ२ लाखांची विमा रक्कम मंजूर करण्यात आली. ही रक्कम डइख गोकुळ नगर, चिखली बीके शाखेमार्फत शाखा व्यवस्थापक गणेश राणे, कॅशियर विकास राठोड व ग्राहक मदतनीस बालाजी कार्लावार यांच्या हस्ते धनादेशाद्वारे देण्यात आली.

# भगवान परशुराम व महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याचा आदर्श हाच समाजहिताचा खरा मार्ग : ताराबाई बोमनाळे

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २० एप्रिल -**

नायगांव शहरात प्रथमच महिलांच्या पुढाकारातून भगवान परशुराम व महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी समाजातील एकल कष्टकरी महिलांचा सन्मान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम राबविण्यात आला.

कीर्तनकार ताराबाई बोमनाळे यांनी आपल्या प्रवचनात भगवान परशुराम यांनी दुष्ट संहारासाठी घेतलेला अवतार आणि महात्मा बसवेश्वर यांनी समाजातील वाईट चालीरीती नष्ट करण्यासाठी केलेले कार्य याचा उल्लेख करत, या महान व्यक्तिमत्त्वांचा आदर्श समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. अशा आदर्शांचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



रविवार, १९ एप्रिल रोजी गजानन नगर येथील 'नृसिंह निवास' येथे हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सुनीता प्रदीप कुलकर्णी (सुजलेगावकर) होत्या. प्रमुख अतिथी म्हणून यमुनाबाई प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनंदा बाळासाहेब पांडे, अध्यापिका उज्वलाबाई बालाजी नागठाणे, नरसी येथील रोहिणी संदीप गुरू नरसीकर तसेच सौ. आम्लापुरे ताई उपस्थित होत्या.

नायगाव ब्राह्मण महासंघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही समाजातील वंचित घटकांना सहभागी करून घेण्याचा उपक्रम राबविण्यात आला. विशेष उपक्रम म्हणून पतीच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणाऱ्या एकल कष्टकरी महिलांचा शोध घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सर्व श्रीमती अनुराधा साहेबराव गौरवाड, ज्योती दत्ता पवार, महादा माधव इबीतवाड, लता बालाजी हाराळे, भाग्यश्री उद्धव कारले आदींचा समावेश होता.

सन्मानित महिलांना साडी-चोळी, थंड पाण्याची बाटली, पुष्पहार व नववस्त्र देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमातून समाजातील दुर्लक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याच श्यामल कुलकर्णी यांनी सांगितले.

यापूर्वीही ब्राह्मण महासंघाने एसटी चालक-वाहकांचा सन्मान, पाणपोई उभारणे, परिचारिका व महिला पोलिस कर्मचाऱ्यांचा गौरव, हातगाडी व रिक्षाचालकांचे विमा संरक्षण, झोपडपट्टीतील कुटुंबांना मदत, तसेच चर्मकार बांधवांना छत्र्यांचे वाटप असे विविध समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत.

हे सर्व उपक्रम जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) बाळासाहेब पांडे यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने राबवले जात असून, समाजात एकात्मता व सहकार्याची भावना वाढीस लागावी हा यामागील उद्देश आहे. यंदाच्या जयंतीनिमित्त महिलांनी घेतलेला पुढाकार समाजात सकारात्मक संदेश देणारा ठरेल, असा विश्वास संयोजक श्यामल कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात सुनंदा पांडे, उज्वला नागठाणे, सुनीता कुलकर्णी आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्यामल श्याम कुलकर्णी यांनी केले, तर आभार कीर्ती मंगेश देशपांडे यांनी मानले.

## महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २० एप्रिल -**

शहरातील श्री बसवेश्वर चौक येथे थोर समाजसुधारक, क्रांतीकारक संत महात्मा बसवेश्वर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून महात्म्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी प्रामुख्याने युवा नेते क्रांतीभाऊ भीमराव केराम, करण येंद्रलवार राघू मामा, भाजपा नेते सुधाकर भोयर, माजी नगराध्यक्ष वेंकटराव नेमानिवार, नगरसेवक श्रीनिवास नेमानिवार,माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार आणि नगरसेवक अभय महाजन यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना वक्त्यांनी महात्मा बसवेश्वरांच्या कार्याचा गौरव केला. या सोहळ्याला सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास नेमानिवार, स्वागत आयनेनीवार, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, प्रवीण राठोड, शेखर नेमानिवार, नगरसेवक प्रतिनिधी मारोती मुनेश्वर, संतोष मारापवार, सतीश नेमानिवार, सतीश बिराजदार, जय वर्मा, महेश बिराजदार, केदार भंडारे, वड्डे आप्पा, महेश पारटकर यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खतगांवात बियाणे व खत खरेदीवर एक दिवसीय सवलत

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २० एप्रिल -**

बिलोली तालुक्यातील ग्राम खतगांव येथील जिजाऊ कृषी सेवा केंद्राच्या वतीने अक्षय तृतीया आणि जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती या दोन्ही पावन शुभमुहूर्तावर

पेरणीपूर्व बियाणे व खत खरेदीवर एकदिवसीय रविवार दि.१९ एप्रिल रोजी परिसरातील शेतकऱ्यांना विशेष सवलत देण्यात आली होती.

सर्वप्रथम जिजाऊ कृषी सेवा केंद्रात क्रांतीसूर्य समतानायक महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस उपस्थित शेतकऱ्यांकडून



पूजन व पुष्पांजली अर्पित करण्यात आली. त्यानंतर खतगांव,थडीसावळी,आदमपूर येथील शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या बियाणे व खत खरेदीवर एकदिवसीय सवलत देण्यात आली.साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या अक्षय तृतीया या दिनी पेरणीपूर्व संदर्भात बाबी खरेदी करणे शुभ मानले जाते.अशी लोकभावना जनमानसात प्रचलित आहे.

या शुभारंभ वेळी बाळासाहेब पाटील,गोविंद पाटील,अमृत पाटील,कृषी व्यावसायिक रामेश्वर पाटील पवार,शंकर पाटील, राम पेटेकर, मारोती पेटेकर, नागनाथ पेटेकर, ज्ञानेश्वर चिंतले,अंबादास चिंतले, रूद्रयअप्पा मठपती, सचिन पाटील हांद्रे,युवराजसिंह चौहाण, मल्लिकार्जुन मठपती,ओमकार कोलमवार,अनिकेत हांद्रे, मन्मथ हांद्रे, मारोती कानगुलवार,बालाजी कानगुलवार,बालाजी हांद्रे, शिवकुमार हांद्रे आदि शेतकरी आवर्जून उपस्थित होते.

# गालबोट न लागता जयंती साजरी, आपण खरे डॉ. आंबेडकरांचे अनुयायी : पो.नि. चिंचोलकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २० एप्रिल -**

सिडको हडको परिसरात नुकतीच महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अगदी पोलीस प्रशासनाने दिलेल्या नियमानुसार हर्षउल्हासात साजरी करण्यात आली या जयंतीच्या मिरवणुकीत कसलाच अनुचित प्रकार घडून गालबोट लागले नाही याचे श्रेय सर्व पोलीस प्रशासनाला देण्यात आले. म्हणून दिनांक १९ एप्रिल रोजी पंचशील बुद्ध विहार हडको येथे ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचा समाज बांधवांच्या वतीने सत्काराचे आयोजन सुनील वडगावकर व त्यांच्या मित्र मंडळांनी आयोजित केला होता. याप्रसंगी उपस्थितताना मार्गदर्शन करताना पोनि. चिंचोलकर म्हणाली की भीम जयंतीस गालबोट न लागता पार पडली हा समाजास्यपणा समाज बांधवांनी दाखवला म्हणून तोच खरा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहेत असे मत व्यक्त केले.




हाडको येथील पंचशील बुद्ध विहार येथे घेण्यात आलेल्या सत्कार सोहळ्याचे आयोजन समाज बांधवांच्या वतीने डीजे संघटनेचे जिल्हा अध्यक्ष सुनील वडगावकर यांनी आयोजित केला होता. तत्पूर्वी पंचशील बुद्ध विहार येथे तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमात ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचा शाल व पुष्पहार घालून महिला भगिनींच्या हस्ते बौद्ध समाज बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते यांनी जयंती अगदी हर्ष उल्हासात पार पाडल्याबद्दल आपली मनोगते मांडली. यावेळी ग्रामीण ठाण्याचे पोलिस. ओमकांत चिंचोलकर यांनी जयंती मिरवणुकी संदर्भात बोलताना म्हणाले की गेले अनेक वर्षापासून जयंती साजरी केली जाते. पण यावर्षी जयंतीच्या मिरवणुकीत बौद्ध अनुयायांनी दारू पिऊन गोंधळ घलने, केस विचित्र रंगबरंगी रंगविणे, दुचाकीचे सायलेन्सर काढून मोठे फटाके फोडणे किंवा आवाज कर्कश करणे, डीजे चा मोठा आवाज करणे, कपडे काढून नाचणे वगैरे असा प्रकार घडला नाही. यासाठी सर्व समाज बांधवांनी पोलीस प्रशासनास सहकार्य केले आणि तुमच्या सहकार्यामुळे ही मिरवणूक परिस्थिती नियंत्रणात ठेवणे पोलिसांना शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळेस या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते प्रीतम जोंधळे, सुभाष डोंगरे, राजू लांडगे, पिराजी लोकरे, विलास गजभारे, अक्षय बनसोडे, डि.के. कांबळे, प्रसेंजित वाघमारे, सम्राट आढाव, प्रदीप हनवते, संजय निळेकर, चंपतराव कांबळे, मनोज नवघरे, शैलेश जोगदंड, महेंद्र पवळे, अंबादास सोनकांबळे, एडवोकेट ढगे, प्रकाश गजभारे,रमाकांत झलारे,राज बुद्धे,

नरेंद्र नहारे, दीपक सावते, कपिल वावळे, भारत मगरे सतिष बंडगर तसेच महिला भगिनी सागरबाई ढवळे, गंगासागर गोडबोले, सुनंदा वाघमारे व शकुंतला कापसे यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे यांनी केले तर सूत्रसंचालन अनिल

हदगांव नगर परिषद हदगांव
MUNICIPAL COUNCIL HADGAON
०२४६८ ऑफिस २२२४०८
Email-id- cohadgaon@gmail.com स्थापना 1954
ह.न.प.जा.क्र./बा./वि./२९०/ २०२६ दिनांक १७/०४/२०२६

शुद्धीपत्रक
(नागरी दलीत्तेत्तर सुधार वस्ती योजना)

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव खालील विकास कामाची निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथता अहर्तापत्र तांत्रिक बी-१ नमुन्यात हिद्वी लिफाफा पद्धतीने स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अनु क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामाचा कालावधी | ई- निविदा फॉम फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद हदगाव येथील सुभद्रा नगर अंतर्गत नांदेड रोड ते कस्तुरी मंगल कार्यालयापर्यंत सी सी. रस्त्याचे बांधकाम करणे | ९९,९९,६८० | ११९९५३/- | करार करते वेळी १% बिलातून ८% | वर्ग ४ व त्यावरील | १८० दिवस | १५०००/- |
| २ | नगर परिषद हदगाव येथील आझाद चौक ते भंगी गल्ली पर्यन्त सी. सी. रस्त्याचे बांधकाम करणे | ९,९६,४००/- | | | | | |
| ३ | नगर परिषद हदगाव येथील कमलाई नगर अंतर्गत धोंडे यांचे घर ते शेवडकर यांच्या घरापर्यंत सी सी. रस्त्याचे बांधकाम करणे | ९,९९,२००/- | | | | | |
| | | १.१९.९५.२८०/- | | | | | |

करिता सदरील कामाची वरील प्रमाणे निविदा काढण्यात आलेल्या होत्या परंतु वरील निविदा ह्या प्रशासकीय कारनाद्वारे सदरील निविदा ह्या रद्द करण्यात येत असून फेर निविदा दि. २०.०४.२०२६ पासून काढण्यात येत आहेत करिता सदरील शुद्धिपत्रक प्रसिद्ध काढण्यात येत आहे.

स्वा.
मुख्याधिकारी
नगर परिषद, हदगाव